


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २२५ ■ रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

## ही मी नाही!'



आयशा खानने तिच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर एक स्टोरी शेअर केली. त्यामध्ये तिने बनावट व्हॉट्सअॅप प्रोफाइलचा स्क्रीनशॉट आणि तो वापरला जाणारा नंबर शेअर केला आहे. त्यासोबत तिने स्पष्ट शब्दांत लिहिले, 'ही मी नाही आहे. कृपया या नंबरवर संपर्क करू नका.' अभिनेत्रीने लोकांना अशा फसवणुकीपासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे.


# मुख्यमंत्र्यांच्या नावे असलेल्या योजनेत भ्रष्टाचार !

**▸▸ पूर्ण रस्त्यावर केमिकल मलमपट्टीने उघडे पाडले सर्वच निकृष्ट काम ▸▸ साईटवरील ज्युनिअर ते कार्यकारी अभियंत्यांची चौकशी करण्याची गरज**









प्रतिनिधी २२फेब्रुवारी

## 21 कोटींच्या सिमेंट रस्त्यावर हजारो भेगा

**अकोला :** राज्यातील महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत राज्य मार्ग ६ वर बाभुळगाव–गुडधी–अलियाबाद–घुसर या १०.७५० कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या दर्जोन्नतीवर प्रश्न उपस्थित होत आहे. १० ऑक्टोबर २०२४ रोजी या कामास प्रारंभ झाला असून पूर्णत्वाची मुदत २४ महिने आहे. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार पुर्ण झालेल्या सिमेंट रस्त्यावर शेकडो ठिकाणी भेगा पडल्या असून त्यावर केमिकलची मलमपट्टी केल्याचे चित्र सुमार दर्जाच्या कामाची पावती देत आहे. या सर्व प्रकरणात साईटवरील ज्युनिअर इंजिनिअर पासून ते कार्यकारी अभियंता याची चौकशी करण्याची गरज आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी पुढाकार घेतील काय अशी विचारणा होत आहे. इतकेच नाही तर या संपुर्ण कामासाठी वापरलेल्या साहित्याचे मोजमाप त्याच बरोबर साहित्यांच्या गुणवत्तेची दक्षता व गुणवत्ता विभागाने चौकशी करण्याची गरज आहे. राज्याच्या ग्राम विकास विभागाने अकोल्यात मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेत झालेल्या भ्रष्टाचाराची पाळमुळे खोदण्याची गरज व्यक्त केली जात आहे. बाभुळगाव ते घुसर या रस्त्याच्या कामाच्या फलकानुसार कामाची अंदाजित किंमत सुमारे १७ कोटी २१ लाख रुपये असून दुसऱ्या पाटीवर पॅकेज क्रमांक आरडीईकेओ–ए ०३१ अंतर्गत २० कोटी ९९ लाख रुपये खर्च दर्शविण्यात आले आहेत. याशिवाय १० वर्षांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी मे. ओबेरॉय कन्स्ट्रक्शन, अकोला यांना ८० लाख रुपये अतिरिक्त मंजूर करण्यात आल्याची नोंद आहे. या रस्त्याचे भूमिपूजन अकोला पूर्वचे आमदार रणधीर सावरकर आणि खासदार अनुप धोत्रे यांच्या हस्ते झाले होते. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, काम सुरू होऊन काही महिने होत असतानाच रस्त्यावर विविध ठिकाणी शेकडो भेगा पडल्याचे दिसून येते. काही भागांमध्ये केमिकल पॅचद्वारे दुरुस्तीचा प्रयत्न करण्यात आल्याचेही पाहायला मिळते. दहा ते अकरा कि.मी. लांबीच्या या सिमेंट रस्त्याच्या साईड शोल्डर भागात मातीचा भराव आणि मुरूम वापरल्याचा दावा करण्यात आला असला, तरी प्रत्यक्ष पाहणीदरम्यान शेजारच्या शेतातील माती टाकल्याचे चित्र असल्याची चर्चा स्थानिकांमध्ये आहे. रस्त्याच्या बाजुला चर खोदल्याचे स्पष्ट चित्र घटनास्थळी आहे. सिमेंट रस्त्यावर दिसणाऱ्या भेगा आणि साईड शोल्डरवरील कामाबाबत तांत्रिक तपासणी व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल सादर करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. जनतेच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीतून उभारल्या जाणाऱ्या रस्त्यांची गुणवत्ता दीर्घकाळ टिकणारी असावी, हीच सर्वसामान्यांची अपेक्षा आहे. त्यामुळे या कामाची स्वतंत्र गुणवत्ता तपासणी करून वास्तव स्पष्ट करण्याची आवश्यकता आहे. याविषयी विभागाच्या अभियंत्यांशी संपर्क केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

**कामाच्या फलकावर असलेल्या नोंदीनुसार**

| | |
|---|---|
| मातीचा भराव | २,३४२ घनमीटर (सुमारे ८२८ ब्रास) |
| जीएसबी | १०,७२८ घनमीटर |
| साईड शोल्डरसाठी | १७,१२४ घनमीटर मुरूम (१४२८ ट्रक) |
| पीक्यूसी | १०,७७० घनमीटर |
| डीएलसी | ६,४४१ घनमीटर |
| एकूण | ४७,४०५ घनमीटर |

### ▸▸ भ्रष्टाचाराचा 'सिमेंट' महामार्ग!

बाभुळगाव, गुडधी, अलियाबाद ते घुसर या १०.७५० कि.मी.च्या रस्त्यासाठी १० ऑक्टोबर २०२४ रोजी कामाचा नारळ फुटला. कागदावर या कामाची मुदत २४ महिने आहे, पण प्रत्यक्षात काम पुर्ण झाल्याचे गावकरी सांगत असून ६ महिने उलटायच्या आतच या सिमेंट रस्त्यावर भल्यामोठ्या भेगा पडल्या आहेत. 'मे. ओबेरॉय कन्स्ट्रक्शन'ला या रस्त्यासाठी १७ ते २१ कोटींची खिरापत वाटण्यात आली आणि देखभालीसाठी अतिरिक्त ८० लाखही मोजले गेले. तरीही दर्जा असा की, जागोजागी रस्ता फाटला असून तो लपवण्यासाठी केमिकलचे ठिगळ लावण्याचे 'थिल्लर' प्रयत्न सुरू आहेत.

### ▸▸ अकोल्यात जनतेच्या २१ कोटींची होळी !

विकासपर्वाच्या नावाखाली राज्यातील जनतेच्या टॅक्सचा पैसा कसा पाण्यात घातला जातो, याचंच ज्वलंत उदाहरण म्हणजे 'मुख्यमंत्री ग्राम सडक योजने'तील बाभुळगाव-घुसर रस्ता आहे. ज्या रस्त्यासाठी तब्बल २१ कोटी रुपये खर्च झाले, तो रस्ता मृत्यूशय्येवर पडला आहे. विशेष म्हणजे, रस्ता फाटलेला असतानाही कंत्राटदाराला वाचवणारे 'कार्यकारी अभियंता' नेमके कुणाचे पाहुणचार घेत आहेत ? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत. या सर्व प्रकरणात चौकशी अंती कंत्राटदार दोषी आढळला तर त्याला ब्लॅक लिस्टेट करण्याची गरज आहे. इतकेच नाही तर ज्युनिअर इंजिनिअर आणि कार्यकारी अभियंता यांनी रस्त्याची निर्मिती होत असताना गुणवत्ता का राखली नाही याची देखील चौकशी करत त्यांच्यावर सरकारी पैशांच्या लुटीचा व निधीचा गैरवापर केल्याचा ठपका ठेवला पाहिजे अशी नागरिकांची मागणी आहे.

## शरद पवारांची प्रकृती पुन्हा बिघडली!

प्रतिनिधी २२फेब्रुवारी



**पुणे :** काही दिवसांपूर्वीच रुग्णालयातून परतलेले ज्येष्ठ नेते शरद पवार यांची प्रकृती पुन्हा बिघडली आहे. शरद पवारांना पुण्यातील रूबी रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अशक्तपणामुळे त्यांना डॉक्टरांच्या देखरेखीत ठेवण्यात आले आहे. माहितीनुसार, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना सकाळपासून अशक्तपणा जाणवत होता. शरीरातील पाण्याची पातळी कमी झाल्याने त्यांना हायड्रेशनचा त्रास जाणवला. त्यामुळे त्यांना रूबी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. डॉक्टरांचे एक पथक त्यांच्या तब्येतीवर लक्ष ठेवून आहेत. सुप्रिया सुळे यांनी सोशल मीडियावर ट्विट करत पवारांच्या तब्येतीची माहिती दिली. आम्ही बाबांना पुढील चाचण्या आणि हायड्रेशनसाठी पुण्यातील रुबी हॉलमध्ये दाखल करत आहोत असं त्यांनी सांगितले आहे.

अजित पवारांच्या निधनानंतर शरद पवार तातडीने मुंबईहून बारामतीला गेले होते. तेव्हापासून पुढील १०-१२ दिवस शरद पवारांची मोठ्या प्रमाणात धावपळ झाली. त्यात थकवा आणि इतर त्रास त्यांना जाणवू लागला होता. खोकल्यामुळे छातीत कफ झाले होते म्हणून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार करण्यात आले होते.

## इयत्ता पाचवी, आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा आज
## 102 परीक्षा केंद्र, 17 हजारावर विद्यार्थी प्रविष्ट

प्रतिनिधी २२फेब्रुवारी



**अकोला :** जिल्ह्यात पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५) आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी)च्या विद्यार्थ्यांसाठी रविवार, २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता प्रारंभ झाला आहे. ही परीक्षा दोन सत्रात घेण्यात येणार असून, यासाठी १०२ परीक्षा केंद्रांवर १७ हजार ०१७ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले आहेत.

शिष्यवृत्ती परीक्षेसाठी इयत्ता ५ वी चे १० हजार ५८६ तर इयत्ता ८ वी चे ६ हजार ४३१ विद्यार्थी प्रविष्ट असून या परीक्षेचा पहिला पेपर रविवारी सकाळी ११ ते १२.३० या वेळेत आणि दुसरा पेपर दुपारी २ ते ३.३० या वेळेत घेण्यात येणार आहे. तालुकास्तरासाठी संबंधित तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी हे तालुका समन्वयक म्हणून परीक्षेची जबाबदारी पार पाडणार आहे. जिल्ह्याचे संपूर्ण नियोजन जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) रतनसिंग पवार यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले आहे. तसेच सह समन्वयक म्हणून जितेंद्रकुमार प्रधान, उपशिक्षणाधिकारी आणि विस्तार अधिकारी श्याम राऊत कामकाज पाहात आहे. सदर परीक्षा निकोप वातावरणात पार पाडावी, यासाठी जिल्हा स्तरावरून आठ भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षेच्या दृष्टीने सुरुवात करणारी ही महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे मार्फत घेतली जाणारी एकमेव परीक्षा असून परीक्षा सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने सर्व उपयोजना करण्यात आल्या आहेत.

| तालुका | पाचवी | आठवी |
|---|---|---|
| अकोला | १८ | १६ |
| अकोट | ७ | ४ |
| बाळापूर | ६ | ५ |
| बार्शिटाकळी | ५ | ४ |
| मूर्तिजापूर | ८ | ५ |
| पातूर | ६ | ४ |
| तेल्हारा | ७ | ३ |
| मनपा | ३ | १ |
| एकूण | ६० | ४२ |

## पेयातून गुंगीचे औषध देत दोघांचा विद्यार्थिनीवर अत्याचार!

प्रतिनिधी २२फेब्रुवारी

**अमरावती :** कॉलेजच्या अंतिम वर्षाच्या गेट-टुगेदर पार्टीत एका विद्यार्थिनीला पेयात गुंगीचे औषध मिसळून बेशुद्ध केले आणि तिच्यावर दोन सख्ख्या भावांनी अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एवढ्यावरच न थांबता तिचे आक्षेपार्ह व्हिडीओ तयार करून तब्बल सात-आठ महिने ब्लॅकमेल केल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी पोलिसांनी चेतन गणेश अंबाडकर आणि आकाश गणेश अंबाडकर (दोघेही रा. निर्मला कॉलनी, जुनीवस्ती, बडनेरा) या दोन भावांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. तक्रारीनुसार, २६ मे २०२५ रोजी रहाटगाव येथील हॉटेलमध्ये अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी गेट-टुगेदर पार्टी आयोजित केली होती. या पार्टीत चेतन आणि आकाश हे दोघेही सहभागी झाले होते. चेतनने वर्धा जिल्ह्यातील आर्वी येथील विद्यार्थिनीला पार्टीसाठी बोलावले. पार्टीदरम्यान तिच्या पेयात गुंगीचे औषध मिसळण्यात आले. पेय घेतल्यानंतर ती बेशुद्ध झाली. त्यानंतर हॉटेलमधील एका खोलीत चेतन अंबाडकर याने तिच्यावर अत्याचार केल्याचे आरोप आहे. या घटनेचे आक्षेपार्ह फोटो व व्हिडीओ काढून ते सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत आरोपींनी विद्यार्थिनीला वारंवार वेगवेगळ्या ठिकाणी बोलावले. तिच्यावर अत्याचार सुरूच ठेवत ५ लाख रुपयांची मागणीही केली. भीतीपोटी विद्यार्थिनीने हा प्रकार कुटुंबीयांपासून लपवून ठेवला. मात्र, मानसिक छळ असह्य झाल्यानंतर तिने अखेर धाडस दाखवत नांदगाव पेठ पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

### यूजीसीने बोगस ठरवलेल्या ३२ विद्यापीठात महाराष्ट्रातील दोन विद्यापीठांचा समावेश

**नवी दिल्ली :** देशात बोगस आणि बनावट विद्यापीठांचा मोठा खुलासा झाला आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने संपूर्ण देशातील ३२ विद्यापीठांना बोगस घोषित केले आहे. यूजीसीच्या या ३२ बोगस विद्यापीठांच्या यादीत महाराष्ट्रातील २ विद्यापीठांचा समावेश आहे. त्यात नागपूर येथील राजा अरबी विद्यापीठ आणि सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय मागासवर्गीय कृषी विद्यापीठाचा समावेश आहे. या शैक्षणिक संस्थेत डिग्री घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरी आणि पुढील शिक्षण नाकारले जाईल, असे आयोगाने स्पष्ट केले. यूजीसीने विद्यार्थ्यांना कुठल्याही कॉलेज अथवा विद्यापीठात प्रवेश घेण्यापूर्वी त्याची मान्यता तपासण्याचं आवाहन केले आहे. या ३२ विद्यापीठांना केंद्र सरकार, राज्य सरकारकडून कुठलीही मान्यता मिळाली नसल्याचे आयोगाने म्हटले आहे.

## जवानाच्या घरी चोरीचा पोलिसांनी केला पर्दाफाश !

प्रतिनिधी २२फेब्रुवारी

### एका महिलेसह तिघांना अटक




**अकोला :** 'जवान सीमेवर अन् ... घर अकोल्यात असुरक्षित!' या मथळ्याखाली सिटी न्यूज सुपरफास्टमध्ये १४ फेब्रुवारीला सचित्र वृत्त प्रकाशित झाले होते. याची दखल घेत पोलिसांनी अवघ्या दहा दिवसात या चोरीचा छडा लावत एका महिलेसह तीन जणांना अटक केली. तसेच त्यांच्याकडून चोरीचा मुद्देमालही हस्तगत करण्यात आला आहे.

जुने शहर पोलिस स्टेशन अंतर्गत सागर कॉलनी वाशीम बायपास भागात १३ फेब्रुवारी रोजी नेहा राजेश सावदेकर यांच्या निवासस्थानी मोठी चोरी झाली होती. एकूण २४ लाखाची चोरी झाली होती. नेहा सावदेकर घरासमोरील गवई यांच्या घरी कामानिमीत्त गेल्या असताना कोणी तरी अज्ञात व्यक्तीने ५२ ग्रॅम चा सोन्याचा नेकलेस तसेच सोन्याचे किमती दागिने आणि ९० हजार रूपये असा ऐवज चोरून नेला होता. या प्रकरणी १३ फेब्रुवारी रोजी त्यांनी तक्रार दिली. पोलिसांनी तपास करताना गुन्ह्यातील संशयितांच्या हालचालींचा बारकाईने मागोवा घेतला. चोरी समीक्षा गवई हिने केली असल्याचा संशय बळावला. तिने मूर्तिजापूर तालुक्यातील हिरपूर येथील जुना प्रियकर ऋतीक श्रृंगारे याला अकोला येथे बोलावले. ऋतीक अजाबराव श्रृंगारे हा त्याचा मित्र समीर तेलखडे रा. आरटीओ रोड कलेक्टर ऑफीस अमरावती हे १२ रोजी संध्याकाळी अकोला येथे आले. समीक्षा गवई व वैभव गोपनारायण रा. कमला नगर, वाशिम बायपास अकोला याच्यासह चिवचिव बाजार परिसरात आले. चोरीचा मुद्देमाल लपविण्याकरीता त्यांच्या सुपुर्द केला. अशी गोपनीय माहिती पोलीसांना मिळाली. त्या दोन संशयित आरोपींचा पाठलाग करून अमरावती येथून तपास पथकाने सापळा रचून ताब्यात घेतले. त्यांची गुन्ह्याच्या अनुषंगाने विचारपूस केली असता गुन्ह्यामध्ये सहभाग असल्याची कबुली दिली. आरोपीच्या ताब्यातून अंदाजे १३८ ग्रॅम वजनाचे २१ लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व गुन्हयात वापरलेली मोटासायकल असा २१ लाख ५० हजाराचा मुद्देमाल जप्त केला. चोरी समिक्षा गवई हिने केल्याचे तपासात निष्पन्न झाले. तिच्यासह वैभव संजय गोपनारायण, ऋतीक अजाबराव श्रृंगारे व समीर प्रदीप तेलखडे या चौघांना अटक करण्यात आली. पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनात पोलिस स्टेशन जुने शहरचे निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या नेतृत्वाखाली कारवाई केली.

## आता वर्दीतील व्हिडीओ पोस्ट करण्यास बंदी !

प्रतिनिधी २२फेब्रुवारी

**मुंबई :** शहरातील सुमारे ५१ हजार पोलिस कर्मचाऱ्यांना वर्दीत (युनिफॉर्ममध्ये) असताना रील्स, मिनी-व्लॉग्स किंवा इतर कोणत्याही प्रकारचे सोशल मीडिया व्हिडीओ तयार करून पोस्ट करण्यास तात्काळ बंदी घालण्यात आली असल्याचा निर्णय मुंबई पोलिसांनी घेतला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार या 'खाकी स्वॅग' गोपनीयतेला व सुरक्षेला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.सोशल मीडियावर पोलिसांच्या वर्दीतल्या व्हिडीओंचा ट्रेंड दिवसेंदिवस वाढत चालला आहे. 'खाकी स्वॅग' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या व्हिडीओंमध्ये पोलिस कर्मचारी डान्स, फिटनेस, ड्यूटी दरम्यानचे क्षण किंवा मजेशीर कंटेंट शेअर करतात.


# CLASSIFIED

**तार फेन्सींग**

तार फेन्सींग प्लॉट व शेतीला वाजवी दरात करुन मिळेल. २० वर्षाचा अनुभव
संपर्क
R.R.Construction
9860828949

**फ्लॅट फ्लॅट फ्लॅट**

नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लॅट
अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त १६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लॅट
पत्ता:- देसाई लेआउट, गणेश कॉलनी जवळ राजापेठ, अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8468872250
8788432278

**प्लॉट प्लॉट प्लॉट**

नवीन लेआउट तपस्या नगरी
फक्त २,५०,०००/- च्या ३ सोप्या किस्ती ११ महिने मुदत मधे प्लॉट
पत्ता :- मौजे मालेगाव, हनुमानगडी समोर, छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8263923606
7757905649


CMYK CMYK

सिटी न्यूज अमरावती
रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# अवैध धंद्यांवर पोलिसांची धडक कारवाई

**खामगाव :** विदर्भाच्या प्रवेशद्वारी असलेल्या मलकापूर शहरात वाढत्या अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी मलकापूर शहर पोलीस ठाणे यांनी धडक कारवाई करत विविध गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीस निरीक्षक गणेश गिरी यांच्या नेतृत्वात ही विशेष मोहीम दि. १ जानेवारी २०२६ ते २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत शहर व परिसरात राबविण्यात आली. दारूबंदी कायद्यांतर्गत करण्यात आलेल्या कारवाईत १६ प्रकरणांमध्ये तब्बल १४ हजार ८०० रुपयांची दारू जप्त करण्यात आली. तर जुगार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत १४ गुन्हे नोंदवून ५ हजार ९९५ रुपयांची रोकड जप्त करण्यात आली असून संबंधितांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याशिवाय संशयितांकडून एकूण ७० मोबाईल फोन जप्त करण्यात आले असून त्यांची अंदाजे किंमत सुमारे ४ ते ४ लाख ५० हजार रुपयांदरम्यान असल्याची माहिती पोलिसांनी दिली. गुटखा, तंबाखू, बिडी, सिगारेट यांसारख्या सार्वजनिक आरोग्यास अपायकारक वस्तूंची अवैध विक्री करणाऱ्यांवरही कारवाई करत ६ प्रकरणांत ८ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# दर्यापूर येथील सोमाणी जिनिंगला लागली आग

## हजारो क्विंटल कापूस जळाला

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी



**दर्यापूर :** दर्यापूर येथील सोमाणी जिनींग ला भयंकर आग लागल्याने हजारो क्विंटल कापूस जळून खाक झाल्याची घटना दर्यापूर अकोला मार्गावरील सूतगिरणी लगत असलेल्या सोमानी यांच्या जिनिंग मध्ये घडली.

दर्यापूर अकोला मार्गावरील नंदू सोमानी यांच्या जिनींग ला सकाळी अचानक आग लागल्याने हजारो क्विंटल कापसाच्या गंजीला आग लागल्याने भयंकर रुद्ररूप धारण केले होते. सकाळी मधीन चालू असताना मशीन मधील पत्त्यातून एक चिंगारी उडून पहिल्यांदा वेस्ट असलेल्या मालाला आग लागली यानंतर लगेच काही क्षणात गंजीला आग लागल्याचे दिसून आल्याने तेथील मजुरांची आग विजवण्याकरिता धावाधाव झाली. परंतु आगीने रुद्र रूप धारण केल्याने आग विझविणे शक्य होत नव्हते. यावेळी लगेच अग्निशमन दलाला फोनवरून आग लागल्याची माहिती देण्यात आली. दर्यापूर येथील अग्निशमन दलाचा बंब उवस्थित झाला व आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी सुरुवात झाली. तसेच अंजनगाव, अकोट, मूर्तिजापूर, अचलपूर येथील अग्निशमन बंब यावेळी आग विजविण्याकरिता उवस्थित झाले होते. दोन ते तीन तास जिनिंग मधील आग विझविण्याचे काम सुरु असताना अग्निशम दलाच्या जवानांना मोठी कसरत करावी लागली यावेळी जिनिंग मधील मजुरांनी, जिनींग मालकांनी, तसेच आजूबाजूला असलेल्या जिनींग वरील मालक कामगार, मजूर यांनी सुद्धा आग विझविण्यात मोलाचे काम केले. दर्यापूर शहरातील सोमाणी यांचा जिनींग नामवंत जिनींग असून यापूर्वी सुद्धा या जिनींगला आग लागून मोठे नुकसान झाल्याचा इतिहास आहे. दर्यापूर शहरात जिनींगला आग लागल्याची बातमी कळताच शेतकरी नागरिकांनी मोठी गर्दी यावेळेस केली होती. सोमाणी जिनींग मध्ये सीसीआयची खरेदी सुद्धा करण्यात येते. सीसीआयच्या कापूसाची गंजी सुद्धा या ठिकाणी होती ती आगीपासून वाचविण्यात यश आल्याने मोठे नुकसान टळले.

# प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत निर्बंधांचा आरोप चुकीचा

## ग्राहकांच्या रक्षणासाठीच महावितरणकडून दक्षता

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**अमरावती:** प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत घराच्या छतावर सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविण्याच्या क्षमतेच्या बाबतीत महावितरणने निर्बंध लादल्याचा सौरऊर्जा प्रकल्प पुरवठादारांचा आरोप चुकीचा आहे. अधिक क्षमतेची रास्त गरज असलेल्या वीज ग्राहकांना महावितरणकडून तपासणीनंतर मंजुरी देण्यात येत आहे. सामान्य घरगुती ग्राहकांसाठी केंद्र सरकारने सुरू केलेल्या या योजनेत पुरवठादारांच्या दबावामुळे ग्राहकांचे नुकसान होऊ नये, यासाठी महावितरणकडून दक्षता घेण्यात येत आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना ही सामान्य घरगुती ग्राहकांसाठी आहे. तथापि, नियमित घरगुती वीज पुरवठ्याच्या गरजेपेक्षा खूप जास्त क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प बसवायचा, केंद्र सरकारकडून अनुदान घ्यायचे, नंतर त्या कनेक्शनचे रुपांतर वाणिज्यिक कनेक्शनमध्ये करून अनुदानाचा गैरफायदा घ्यायचा, असे प्रकार घडल्याचे महावितरणच्या निदर्शनास आले.

महावितरणकडे अशा तक्रारी आल्या होत्या की, वीज ग्राहकांचा विजेचा वापर कमी असल्याने त्यांची एक किंवा दोन किलोवॅटच्या प्रकल्पाची गरज असताना पुरवठादारांकडून त्यांच्यावर अधिक क्षमतेचा प्रकल्प बसविण्यासाठी दबाव आणण्यात येत आहे. यामुळे गरज नसताना संबंधित घरगुती ग्राहकावर जास्त क्षमतेच्या प्रकल्पाच्या खर्चाचा बोजा पडतो. हे ध्यानात घेऊन महावितरणने ग्राहकांचा प्रत्यक्ष विजेचा वापर किती आहे हे ध्यानात घेऊन त्यानुसार स्वयंचलित व्यवस्थेत विजेच्या मंजूर भाराला (लोड) मान्यता देण्याची व्यवस्था केली. त्यानुसार त्या ग्राहकाला सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविता येतो. तथापि, ग्राहकाच्या नियमित वीज वापरापेक्षा खूप जास्त क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प बसविण्याची मागणी आली तर त्यासाठी महावितरणच्या यंत्रणेकडून स्थल निरीक्षण करून रास्त मागणी असल्याचे स्पष्ट झाल्यावर मंजुरी देण्यात येईल.

**योजनेच्या अंमलबजावणीत महावितरणची देशात आघाडी**

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेसाठी महावितरण ही महाराष्ट्रासाठीची नोडल एजन्सी आहे. ही योजना फेब्रुवारी २०२४ मध्ये सुरू झाली. गेल्या दोन वर्षात राज्यात ४.५३ लाख वीज ग्राहकांना योजनेचा लाभ झाला असून त्यांची एकत्रित सौरऊर्जानिर्मिती क्षमता १,७२२ मेगावॅट आहे. या ग्राहकांना ३,१६२ कोटी रुपये अनुदान मिळाले आहे. या योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र राज्य देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. या योजनेचा वापर करून महावितरणने संपूर्ण गाव सौर ऊर्जेवर चालविण्यासाठी सौरग्राम योजना सुरू केली असून आतापर्यंत १७ गावे सौरग्राम झाली आहेत.

# राष्ट्रवादी काँग्रेसचे मनपा स्वीकृत सदस्य भोजराज काळे यांचे आ. सुलभा खोडके यांनी केले अभिनंदन

## सर्वसामान्य सहकाऱ्याला संधी दिल्याबद्दल स्वीकृत नगरसेवक भोजराज काळे यांनी व्यक्त केली कृतज्ञता

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी



**अमरावती:** अमरावती महानगर पालिकेच्या स्वीकृत सदस्य पदी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कडून भोजराज वामनराव काळे यांची निवड करण्यात आली असून काल २० फेब्रुवारी रोजी महापालिकेत झालेल्या आमसभेमध्ये भोजराज काळे यांना स्वीकृत नगरसेवक पदी अधिकृत प्रमाणपत्र देऊन घोषित करण्यात आले. या निवडीनंतर स्वीकृत नगरसेवक भोजराज काळे यांनी आज शनिवार दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महासचिव (संघटन )आमदार - संजय खोडके व अमरावतीच्या आमदार- सौ. सुलभाताई खोडके यांची भेट घेतली असता आमदार महोदयांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करीत मनपातील वाटचालीबाबत शुभेच्छा दिल्या.

मनपाचे स्वीकृत नगरसेवक - भोजराज काळे हे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय ),शिक्षण क्षेत्रात सक्रिय असून अध्यक्ष निसर्ग सांस्कृतिक चळवळ व कलामंच अमरावती, चेअरमन सल्लागार समिती नॅशनल फेडरेशन दिल्ली, सल्लागार , महाराष्ट्र राज्य आयटीआय निदेशक संघटना, सभापती आयटीआय निदेशक ग्राहक भंडार अमरावती, सरचिटणीस राज्य शिक्षक संघ , अशा विविध संघटनांमध्ये ते सक्रिय असून राष्ट्रवादी काँग्रेस परिवाराचे एक सर्वोत्तम सहकारी म्हणून सुद्धा त्यांची ओळख आहे. म्हणूनच त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक ,सांस्कृतिक ,शिक्षण क्षेत्र, कर्मचारी संघटना क्षेत्र, अशा विविध क्षेत्रातील काम व दांडगा अनुभव लक्षात घेता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून अमरावती महानगर पालिकेच्या स्वीकृत सदस्य पदी निवड करून भोजराज काळे यांना काम करण्याची संधी बहाल करण्यात आली आहे. यावेळी आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी भोजराज काळे यांना शुभेच्छा देतांना सांगितले कि, महापालिकेत जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडून त्यांच्या समस्या सोडविणाऱ्या प्रतिनिधींची गरज असते. भोजराज काळे हे लोक चळवळ व जनआंदोलनातून घडलेलं व्यक्तिमत्व असल्याने निश्चितच त्यांच्या हातून जनहिताचे काम मार्गी लागण्याला घेऊन ते आपली जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडणार आहे. अशा विश्वास आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी व्यक्त केला. तसेच आ.संजय खोडके म्हणाले कि, महापालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला पाहिजे तसे यश मिळाले नसले तरी ११ नगरसेवक निवडून आले. आता पक्षाला एक स्वीकृत नगरसेवक पद मिळाले आहे. महापालिकेतील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रत्येक नगरसेवक हे सुशिक्षित , सुसंस्कारित व प्रतिभासंपन्न असून जनतेसाठी चांगले काम करण्याची तळमळ बाळगणारे आहेत. भोजराज काळे हे एक अभ्यासु, झुंजार व लढवय्या सहकारी असल्याने महापालिकेत जनसामान्यांचा आवाज अधिक बुलंद होणार असल्याचे सांगून आ. संजय खोडके यांनी आपल्या शुभेच्छा व्यक्त केल्या. महापालिकेत स्वीकृत नगरसेवक पदाच्या निवडीबद्धल भोजराज काळे यांनी आ.संजय खोडके व आ.सुलभाताई खोडके तसेच राष्ट्रवादी काँग्रेस परिवाराबद्दल आभार व्यक्त केले.

# शाळकरी मुलांची सुरक्षित ने - आण करा

## पोलीस आयुक्तांचे आदेश

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी



**अमरावती :** शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षीत वाहतुक ही बाब शासनादवारे गांभीर्याने घेण्यात येते. विद्यार्थी हा केंद्रस्थानी ठेवुन त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शासन अधिसुचना क्रमांक MVR-०८८/ प्र.क्र. १५३/परि-२ दिनांक २२/०३/२०११ अन्वये जिल्हा स्कुल बस सुरक्षीतता समितीची स्थापना करण्यात आली आहे.

शाळकरी मुलांची सुरक्षीत ने आण करण्याकरीता सुरक्षीततेशी संबंधीत मुददयांबाबत आढावा घेण्याच्या अनुषंगाने शुक्रवार दिनांक २०/०२/२०२६ रोजी दुपारी ०४.०० वा. पोलीस आयुक्त कार्यालय अमरावती शहर येथे जिल्हा स्कुल बस सुरक्षीतता समिती सभेचे आयोजन करण्यात आले. या बैठकी दरम्यान दिनांक १०/०७/२०२५ रोजी घेण्यात आलेल्या जिल्हा स्कुल बस सुरक्षीतता समिती बैठकीतील मुददयांचा सर्वप्रथम आढावा घेण्यात आला. यानंतर बैठकीत शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीच्या दृष्टीने शालेय परविहन समितीचे कर्तव्य, शाळा व्यवस्थापन, शिक्षण विभाग, प्रादेशिक परिवहन विभाग, वाहतुक विभाग, खाजगी स्कुल बस वाहतुकदार तसेच पालक यांचे आपसात समन्वय असणे या विषयावर भर देण्यात आला.

१२ आसन क्षमतेपेक्षा जास्त आसन क्षमता असलेल्या स्कुल बस मध्ये स्त्री सहवर्ती यांची नेमणुक करावी. स्कुल बस चालक व सहवर्ती यांचे चारित्र पडताळणी करणे, स्कुल बस मध्ये णणऊन् यंत्रणा, प्रथमोपचार पेटी, संकट कालीन मार्ग, वाहनांची योग्य रखरखाव (देखभाल), स्पीड गव्हर्नर बसविणे तसेच स्कुल बसचे योग्यता प्रमाणपत्र नियमीत काढणे, योग्यता प्रमाणपत्र नसलेल्या किंवा कालबाहय स्कुल बस विरुध्द संयुक्तपणे कार्यवाही करुन अशी वाहने रस्त्यावर धावणार नाही यादृष्टीने कायदेशीर कारवाई करणे, तसेच स्कुल बस चालक मालक / विद्यार्थी -पालक यांचा Whats appGroup तयार करुन लोकेशन शेअर करणे. या सारख्या महत्वाच्या मुददयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर बैठकीचे अध्यक्ष राकेश ओला पोलीस आयुक्त अमरावती शहर, यांनी उपस्थितांना शालेय विद्यार्थ्यांची वाहतुक सुरक्षीत व अपघात विरहीत होण्याच्या दृष्टीने आवश्यक मार्गदर्शन केले.

# उद्या संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा बेचाळिसावा दीक्षांत समारंभ

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी



**अमरावती :** विद्यापीठाचा बेचाळिसावा दीक्षांत समारंभ सोमवार, दि. २३ फेब्रुवारी, २०२६ रोजी १०.०० वाजता विद्यापीठ परिसर, अमरावती येथे संपन्न होत आहे. या समारंभाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते भूषवतील. याप्रसंगी जनरल मनोज पांडे (निवृत्त), मा. माजी भारतीय लष्कर प्रमुख, पी.व्ही.एस.एम. (परम विशिष्ट सेवा मेडल), ए.व्ही.एस.एम. (अति विशिष्ट सेवा मेडल), व्ही.एस.एम. (विशिष्ट सेवा मेडल) हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहून दीक्षांत भाषण करतील. दीक्षांत समारंभाला विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. याशिवाय या कार्यक्रमाला विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सर्व सन्माननीय सभासद तसेच सर्व विद्याशाखांचे सन्माननीय अधिष्ठाता उपस्थित राहतील. अशी माहितीपत्र परिषदेमध्ये कुलगुरू डॉक्टर मिलिंद बारहाते यांनी माहिती दिली.

विद्यापीठ स्थापनेला ४३ वर्ष पूर्ण होत आहे. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये आणि पदव्युत्तर शैक्षणिक विभागांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य निरंतरपणे सुरू आहे. ४५१ महाविद्यालये विद्यापीठाशी आजमितीस संलग्नित असून त्यातील ०८ महाविद्यालये स्वायत्त आहेत. परीक्षांचे बदललेले स्वरूप, सेमिस्टर, वेळेवर निकाल यामुळे परीक्षा घेण्याचे कार्य कार्यक्षमतेने व गतीशील करण्याचा विद्यापीठाचा सातत्यपूर्ण प्रयत्न नेहमीच असतो.

उन्हाळी २०२५ मध्ये ७४६ परीक्षांचे संचालन करण्यात आले, या परीक्षेसाठी एकूण २,७६,७५७ परीक्षार्थी होते. त्यापैकी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची संख्या १,५६,८९० तर माजी विद्यार्थ्यांची संख्या १,१९,८६७ इतकी होती. हिवाळी २०२५ मध्ये ६८९ परीक्षा घेण्यात आल्यात, त्याला २,७५,४८७ परीक्षार्थी होते.

दिवसेंदिवस विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. तद्वतच अभ्यासक्रमांची संख्या वाढली आहे. नवीन राष्ट्रीय धोरण विद्यापीठाने लागू केले असल्यामुळे विविध कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना शिकविले जात आहेत. केवळ परीक्षा घेण्यापुरतेच विद्यापीठ काम करीत नाही, तर दर्जेदार अभ्यासक्रमासोबतच विहित मुदतीत निकाल सुद्धा लावल्या जातो. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी विविध संशोधन, साहित्यिक, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक व ज्ञानवर्धक उपक्रमसुद्धा विद्यापीठाच्यावतीने राबविले जातात. स्टार्टअप साठी विद्यार्थ्यांना चालना मिळावी, यासाठी सीड फंड दिल्या जात आहे. या दीक्षांत समारंभामध्ये ४२,३१७ पदवीकांक्षींना पदवी व २५५ पदवीकांक्षींना पदविका प्रदान करण्यात येणार आहे. विद्याशाखानिहाय पदवीकांक्षींची संख्या : मानव विज्ञान विद्याशाखा १०७८७, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा ७९१३, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा १७१५५ आणि आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा ४४३३, या व्यतिरिक्त स्वायत्त शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती ४५१, स्वायत्त शारीरिक शिक्षण महाविद्यालय (एच.व्ही.पी.एम.), अमरावती ८५२, स्वायत्त शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती ४३९, स्वायत्त प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅन्ड रिसर्च, बडनेरा १७७ व स्वायत्त पी.आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅन्ड मॅनेजमेंट, अमरावती ११० इतक्या पदवीकांक्षींना सुध्दा पदवी दिल्या जाणार आहेत. संलग्नित महाविद्यालयांतील पात्र पदविकाधारकांची विद्याशाखानिहाय संख्या : मानव विज्ञान विद्याशाखा ०६, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा १२३, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा १७ आणि आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा १०९ अशी आहे.

# अमरावतीत तरुणाची निर्घृण हत्या; आरोपी मित्र गुजरातकडे फरार

**अमरावती :** अमरावती ते नागपूर महामार्गावरील तिवसा गावाजवळील विश्रांतीस्थळी शुक्रवारी सकाळी एका ३० वर्षीय तरुणाचा खून झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या प्रकरणात मृत तरुणाचा मित्रच आरोपी असून तो गुजरातच्या दिशेने पळून गेल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे.

मृत तरुणाचे नाव विमल अग्रावत (३०, रा. राजकोट, गुजरात) असे आहे. तो मूळचा राजकोट येथील रहिवासी असला तरी काही महिन्यांपासून मुंबईत राहत होता. तो मुंबईत नेमके काय काम करत होता, याबाबत पोलिस तपास सुरू आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, शुक्रवारी पहाटे चार वाजताच्या सुमारास विमल आणि त्याचा मित्र तिवसाळा येथील विश्रांतीस्थळी थांबले होते. काही वेळ विश्रांती घेतल्यानंतर सकाळी सात वाजण्याच्या सुमारास विमलचा खून करण्यात आला. त्यानंतर आरोपी मित्राने घटनास्थळावरून पळ काढला. विमल अग्रावत याच्याविरुद्ध गुजरातमध्ये तीन गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामध्ये प्राणघातक हल्ला, चोरी आणि इतर एका गुन्ह्याचा समावेश आहे. घटनेची माहिती मिळताच ग्रामीण पोलिस घटनास्थळी दाखल झाले. आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी गुजरातच्या दिशेने पथके रवाना केली आहेत. दरम्यान, पोलिसांनी आरोपीचा मोबाईल ट्रॅक करण्यास सुरुवात केली आहे. आरोपीने मोबाईल बंद केल्यामुळे शोधमोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिस आरोपीच्या हालचालींचा माग काढत आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलिस पुढील तपास करत आहेत.

# नवसारी येथील झोपडपट्टी तील नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी

**अमरावती:** अमरावती मनपा आरोग्य विभाग अंतर्गत शहरी आरोग्य केंद्र महिंद्र कॉलनी मधील आरोग्य वर्धनी केंद्र नवसारी मध्ये आयुक्त सौम्या शर्मा चांडक ,अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक ,आरोग्य अधिकारी डॉ विशाल काळे ,साथ रोग नियंत्रण अधिकारी , डॉ अकिब वैद्यकीय अधिकारी महिंद्र कॉलनी यांच्या मार्गदर्शनाच्या माध्यमातून येथील झोपडपट्टी मध्ये असंसर्गजन्य आजाराचे शिबिर ,कुष्ठरोग तपासणी तसेच राष्ट्रीय कीटकजन्य कार्यक्रम मधील संसर्गजन्य .जलजन्य कीटकजन्य आजार मलेरिया ,डेंगू चिकन गुनिया चे आजार आहे किंवा नाही ह्या साठी झोपडपट्टी मधील लहान मुलापासून तर म्हाताऱ्या पर्यंत व गर्भवती महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली बीपी, शुगर, ॲनिमिया ,रक्त तपासणी रोगनिदान शिबिर करून शेकडो मूल,मुली, गर्भवती महिला ,यांनी औषधोपचार घेतला तसेच कुष्ठरोग अधिकारी डॉ.विनंती नवरे यांनी कुष्ठरोगाचे लक्षणे व त्या बद्दल माहिती दिली व सर्वांची तपासणी सुद्धा केली.

# जकात : सामाजिक न्याय आणि आर्थिक समतेची इस्लामी परंपरा

रमजान महिन्याच्या पवित्र काळात मुस्लिम समाजात जकातची अनिवार्यता आणि तिचे सामाजिक महत्त्व पुन्हा एकदा ठळकपणे समोर येते. इस्लाम धर्माच्या पाच स्तंभांपैकी एक असलेली जकात ही केवळ धार्मिक कर्तव्य नसून सामाजिक न्याय आणि आर्थिक समतेची प्रभावी व्यवस्था मानली जाते. सातव्या शतकात सुरू झालेली ही प्रणाली आजही गरजूंना आधार देणारी आणि समाजात संतुलन निर्माण करणारी ठरते.

इस्लामच्या प्रारंभीच्या काळात मक्का आणि मदिना येथे इस्लामी समाजाची स्थापना होत असताना श्रीमंत आणि गरीब यांच्यात मोठी दरी होती. अनाथ, विधवा, कर्जबाजारी आणि गरजू लोकांसाठी कोणतीही सामाजिक सुरक्षा व्यवस्था नव्हती. अशा परिस्थितीत इस्लामचे पैगंबर हजरत मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या मार्गदर्शनाखाली जकातची व्यवस्था लागू करण्यात आली, जेणेकरून संपत्ती काही मोजक्या लोकांपुरती मर्यादित राहू नये आणि गरजूंना त्यांचा हक्क मिळावा.

पवित्र कुरआनमध्ये नमाजसोबत जकात अदा करण्याचा स्पष्ट आदेश देण्यात आला आहे. 'जकात' या शब्दाचा अर्थ शुद्धी आणि वाढ असा होतो. इस्लामी शिकवणीनुसार, व्यक्ती आपल्या संपत्तीचा ठराविक भाग गरिबांना देते तेव्हा उर्वरित संपत्ती शुद्ध होते आणि त्यात बरकत येते.

धार्मिक नियमांनुसार, ज्या व्यक्तीकडे हाजत-ए-असली (राहण्याचे घर, वापरण्याचे कपडे, घरगुती आवश्यक वस्तू इत्यादी मूलभूत गरजा) यांपेक्षा जास्त मालमत्ता निसाबच्या प्रमाणात पूर्ण एक हिजरी वर्ष टिकून राहते, त्याच्यावर जकात फर्ज होते. निसाबची पारंपरिक मर्यादा सुमारे ८७.४८ ग्रॅम सोने किंवा ६१२.३६ ग्रॅम चांदी इतकी आहे.

सध्याच्या काळात, आवश्यक गरजा आणि कर्ज वजा केल्यानंतर एखाद्या व्यक्तीकडे सुमारे १,६४,२०० रुपये किंवा त्याहून अधिक रक्कम (किंवा त्यासम मूल्याचे सोने-चांदी/व्यापारी माल) एक वर्षभर शिल्लक असल्यास त्याच्यावर जकात अदा करणे बंधनकारक होते. ही रक्कम चांदीच्या बाजारभावानुसार बदलू शकते, त्यामुळे दरवर्षी चालू दरानुसार गणना करणे आवश्यक आहे.

या मर्यादेपेक्षा अधिक संपत्ती असल्यास एकूण मालमत्तेच्या २.५ टक्के (चाळीसावा हिस्सा) जकात म्हणून द्यावा लागतो. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीकडे वर्षअखेरीस दोन लाख रुपये शुद्ध बचत असल्यास त्याने पाच हजार रुपये जकात द्यावी.

जकात गरिबांना, गरजूंना, कर्जबाजारी व्यक्तींना, अनाथांना, प्रवाशांना तसेच समाजोपयोगी कार्य करणाऱ्या पात्र लोकांना दिली जाते. आई-वडील, मुले किंवा पत्नी यांना जकात देता येत नाही, कारण त्यांचा सांभाळ करणे ही व्यक्तीची वैयक्तिक जबाबदारी असते.

रमजान महिन्यात इबादत आणि दानधर्माचे महत्त्व अधिक असल्याने बहुतेक लोक याच महिन्यात जकात अदा करतात. याशिवाय सदका आणि फित्रा यांच्या माध्यमातूनही गरजूंना मदत केली जाते, जेणेकरून ईदच्या आनंदात सर्वजण सहभागी होऊ शकतील.

जकात व्यवस्था समाजात आर्थिक संतुलन निर्माण करण्याचे प्रभावी साधन आहे. शिक्षण, आरोग्य, विवाह सहाय्य, रोजगार आणि वैद्यकीय मदत अशा विविध क्षेत्रांत जकातची रक्कम उपयुक्त ठरत आहे. आज अनेक मशिदी आणि सामाजिक संस्था पारदर्शकतेने जकातचे संकलन आणि वितरण करत आहेत.

जकातचा मूलभूत संदेश असा आहे की संपत्ती हा केवळ वैयक्तिक अधिकार नसून ती एक सामाजिक जबाबदारीदेखील आहे. रमजानच्या पवित्र प्रसंगी ही परंपरा समाजाला समानता, करुणा आणि मानवतेचा संदेश देते आणि सामाजिक ऐक्य अधिक दृढ करते.

जावेद जकारिया
अकोला,
अध्यक्ष, कच्छी मस्जिद ट्रस्ट, अकोला



३

सिटी न्यूज अकोला

रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अनुसूचित जातीतील युवकांना विनामूल्य डीटीपी प्रशिक्षण

**अकोला:** जिल्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रातर्फे अनुसूचित जातीतील युवकांसाठी एक महिना कालावधीचे विनामूल्य डीटीपी तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येणार आहे. प्रशिक्षण दि. २८ फेब्रुवारी ते ०४ एप्रिलदरम्यान विवेकानंद संगणक केंद्र, वानखडे नगर, अकोला येथे होईल. अनुसूचित जातीतील युवक- युवती, नवउद्योजकांना उद्योजकता विकास संबंधी प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःचा उद्योग व्यवसाय - स्वयंरोजगार निर्माण करण्यास प्रवृत्त करणे हा उद्देश आहे. या अनिवासी स्वरुपाच्या प्रशिक्षण कार्यक्रमामधून सहभागी प्रशिक्षणार्थींना डी.टी.पी. चे परिपूर्ण तांत्रिक प्रशिक्षण देऊन यासोबतच उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास, उद्योग आधार नोंदणी, अधिकारी वर्गामार्फत मार्गदर्शन केले जाणार आहे.

## श्री दुर्गादेवी संस्थानच्या पायी वारीला उत्स्फूर्त प्रतिसाद



**अकोला:** श्री दुर्गादेवी संस्थान शिवर यांच्या विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही शिवर ते शेगाव पायीवारी २१ रोजी भक्तिमय वातावरणात शेगाव करीता रवाना झाली. शिवर येथील जागृत श्री दुर्गादेवी मंदिरातील श्री दुर्गादेवी मुर्तीचे तसेच श्री गजानन महाराजांच्या मूर्तीचे विधिवत पूजन व सामूहिक आरती करून वारीची सुरुवात करण्यात आली.

टाळ–मृदंगाच्या गजरात आणि ‘श्री गजानन महाराज की जय’ च्या घोषणांनी शिवर नगरी दुमदुमून गेली होती. भाविकांच्या डोळ्यांत भक्तिभाव आणि ओठांवर नामस्मरणाचे सूर ऐकू येत होते. वारी ज्या मार्गाने पुढे सरकत होती, त्या मार्गावर महिलांनी आकर्षक रांगोळ्या काढून वारकऱ्यांचे स्वागत केले. ठिकठिकाणी श्री गजानन महाराजांच्या पालखीचे पुष्पवृष्टीने स्वागत करण्यात आले. याप्रसंगी बोलताना जगदीश मुरुमकार यांनी सांगितले की, ‘या वारीला अनेक वर्षांची अखंड परंपरा लाभली असून सर्व धर्मीय नागरिक मोठ्या उत्साहात आणि स्वयंस्फूर्तीने सहभागी होतात. सामाजिक एकोपा आणि बंधुभाव जपण्याचे कार्य श्री दुर्गादेवी संस्थानच्या वतीने सातत्याने, कोणताही खंड न पडता सुरू आहे.

# शिवजयंती उत्सव उत्साहात साजरा

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**पातूर:** डॉ. राहुल पाटील एज्युकेशनल कॅम्पस अंतर्गत डॉ. वंदनाताई जगन्नाथराव ढोणे ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालय येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य व प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात झाला.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून धनेश्वरी मानव विकास मंडळ चे संस्थापक अध्यक्ष डॉ. वेद प्रकाश पाटील उपस्थित होते.

कार्यक्रमास डॉ. साजिद शेख, डॉ. जयश्री काटोले, डॉ. अभय भुस्कळे यांची उपस्थिती लाभली मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य कसे उभारले, रयतेसाठी कशाप्रकारे न्यायनिष्ठ व लोकाभिमुख प्रशासन उभे केले यावर सविस्तर प्रकाश टाकला.

छत्रपती शिवाजी महाराजांनी धर्म, जात, पात यांचा भेदभाव न करता ङ्करयत हाच माझा धर्मङ्क ही भूमिका स्वीकारली. आधुनिक तंत्रज्ञानाच्या त्या काळातील साधनांचा कुशलतेने वापर करून, गनिमी कावा, जलद दळणवळण व्यवस्था, सशक्त गड-किल्ल्यांची बांधणी व सक्षम आरमार उभारून मुघल साम्राज्याला कशी मात दिली याचे प्रभावी विवेचन करण्यात आले. त्यांच्या दूरदृष्टी, शौर्य आणि संघटन कौशल्यामुळे स्वराज्याची भक्कम पायाभरणी झाली, हे अधोरेखित करण्यात आले.



या कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन प्रथम वर्षाचा विद्यार्थी गजानन गाडगे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. प्रशांत निकम यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, रुग्णालयीन कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला.

# अकोट शहरातील कालंका माता मंदिरात चोरी

वि. प्रतिनिधी २२ फेब्रुवारी



**अकोट:** अकोट शहरातील शिवाजीनगर भागात असलेल्या कालका माता मंदिर येथे अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्रीच्या सुमारास धाडसी चोरी करत दानपेटी फोडून त्यातील रोकड तसेच मंदिरातील सोन्या-चांदीचे दागिने लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. सकाळी मंदिर उघडण्यासाठी आलेल्या पुजाऱ्यांना चोरीचा प्रकार लक्षात येताच परिसरात एकच खळबळ उडाली.

मिळालेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी मंदिरात प्रवेश करत दानपेटी उचकटली. त्यानंतर देवीच्या मूर्तीवरील काही सोन्या-चांदीचे दागिने काढून नेल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. दानपेटीत किती रक्कम होती याचा नेमका अंदाज अद्याप लागलेला नसला तरी मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

घटनेची माहिती मिळताच अकोट शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार सह पोलीसांचा मोठा ताफा घटनास्थळी दाखल झाला. पंचनामा करून परिसराची पाहणी करण्यात आली. मंदिर परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्याचे काम सुरू असून, संशयितांचा शोध घेण्यासाठी पोलीसांनी विशेष पथक नेमले आहे.

पोलिसांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले असून, संशयास्पद हालचाली दिसल्यास त्वरित पोलीसांना कळविण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान, या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, तपास अकोट शहर पोलिस करीत आहेत.

# कत्तलीसाठी बांधून ठेवलेली दहा जनावरे जप्त; अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

वि. प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**अकोट:** अकोट शहर पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करत कांगरपुरा कब्रस्तान येथील मोकळ्या जागेतून कत्तलीसाठी बांधून ठेवलेली दहा जनावरे जप्त केली. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांना मिळालेल्या माहितीच्या आधारे २१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी चार ते पाच वाजताच्या दरम्यान संबंधित ठिकाणी धाड टाकण्यात आली. त्यावेळी आठ बैल, एक गाय व एक वासरू अशी एकूण दहा जनावरे संशयास्पद अवस्थेत बांधून ठेवलेली आढळून आली. जप्त करण्यात आलेल्या जनावरांची अंदाजे किंमत १ लाख १५ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले.



सदर जनावरांबाबत परिसरातील नागरिकांकडे चौकशी करण्यात आली; मात्र त्यांच्या मालकीबाबत कोणीही पुढे आले नाही. त्यामुळे हेकॉ अनिल वक्ते यांनी अज्ञात आरोपीविरुद्ध अकोट शहर पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली.

या फिर्यादीवरून महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोहेकॉ गणेश सोळंके करीत आहेत. पोलिसांनी जनावरे सुरक्षित ताब्यात घेत पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली आहे.

# केंद्रीय अर्थसंकल्पावर व्यापारी, उद्योजक संवाद सभा

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**अकोला:** भाजप व्यापारी आघाडीच्या वतीने आळशी संकुल येथील भाजप कार्यालयात केंद्रीय अर्थसंकल्पवर व्यापारी, उद्योजक संवाद सभा झाली. भाजप महानगर कोषाध्यक्ष वसंत बाछुका यांच्या अध्यक्षतेत व भाजप महानगर व्यापारी आघाडीचे अध्यक्ष निकेश गुप्ता व केंद्रीय अर्थसंकल्पचे जिल्हा संयोजक ॲड. देवाशीष काकड यांनी पुढाकार घेतला होता.

भाजपचे प्रदेश महासचिव आ. रणधीर सावरकर, खा. अनुप धोत्रे, भाजप महानगर अध्यक्ष जयंतराव मसने व प्रमुख वक्ते म्हणून सीए असो. चे माजी अध्यक्ष केयूर देढीया उपस्थित होते. मान्यवरांच्या स्वागताने या सभेस प्रारंभ करण्यात आला.



सीए केयूर देढीया यांनी अर्थसंकल्प विकासाला चालना देणारा असल्याचे सांगितले. व्यापारी, उद्योजक, एमएसएमई, स्टार्ट-अप्स व स्थानिक बाजारपेठ यावर संवाद साधीत विचार व्यक्त केले. खा. अनुप धोत्रे यांनी केंद्रीय अर्थसंकल्प राष्ट्राच्या विकासाची किल्ली असून यामध्ये व्यापार, उद्योग समवेत सामान्य माणसाच्या विकासाचा पण विचार करण्यात आला असल्याचे सांगितले. यावेळी आ. रणधीर सावरकर यांनी व्यापारी व उद्योजकांनी आपल्या उत्पादनाला चालना देण्याचे आवाहन केले. वसंत बाछुका यांनी व्यक्त केले. संचलन व्यापार आघाडीचे अध्यक्ष निकेश गुप्ता यांनी तर आभार संतोष छाजेड यांनी मानलेत. यावेळी भाजपा सरचिटनिस संजय गोटफोडे, माधव मानकर, नगरसेवक पवन महल्ले, माजी नगरसेवक विनोद मनवानी, कॅट अकोला अध्यक्ष राहुल गोयनका, कॅटचे हिशोबनीस चंचल भाटी, राजकुमार राजपाल, श्रीकर सोमन, शैलेश अलीमचंदानी, श्रीकांत गोयनका, अकाउंटंट निलेश अग्रवाल, चमन अग्रवाल, नितेश पाली, संतोष छाजेड, एड आनंद रानडे, केतन गुप्ता, रितिक अग्रवाल, अमित वानखडे, राहुल मेहता, अभय गुप्ता, संजय झाडोकार, भूषण इंदोरिया, जुनेद खान पठाण, बरकत शाह, राजेश वानखडे, चंदू महाजन, सुरेंद्र चव्हाण, किरण बोधले जमीर अहमद, पंकज राठी, कमलेश अहीर, विनोद जकाते आदी उपस्थित होते.

## निधन वार्ता

**शेख इज्जतुल्ला जाहगीरदार**



**हातरूण:** बाळापूर तालुका कांग्रेस कमेटीचे माजी अध्यक्ष शेख ईज्जत्तउल्ला जाहगीरदार ८०, यांचे शुक्रवारी निधन झाले. शेख ईज्जत्ताउल्ला जाहगीरदार यांनी तालुका कॉंग्रेस कमेटीचे अध्यक्ष म्हणून अनेक वर्ष निष्ठेने काम केले. त्यांचे मुळ गाव असलेल्या हातरूण येथे शुक्रवारी रात्री त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पक्षात पत्नी, एक मुलगा, चार मुली असा परिवार आहे.

# नरनाळा महोत्सवात सार्थक देवरला चित्रकला स्पर्धेत द्वितीय पारितोषिक

वि. प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**अकोट:** ‘नरनाळा महोत्सवात आयोजित जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेत येथील श्री. भाऊसाहेब पोटे विद्यालयाचा विद्यार्थी सार्थक महेश देवर याने द्वितीय क्रमांक पटकावला. ८५ स्पर्धकांमधून त्याने बाजी मारली. जिल्हाधिकारी वर्षा मिना यांच्या हस्ते सार्थकला ७,५०० रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. चित्रकला शिक्षक जयंत वावगे यांचे मार्गदर्शन लाभले. सार्थकच्या यशाबद्दल शाळेत प्राचार्य प्रवीण रावणकार, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन केले.



# आमदार साजिद खान पठाण यांना वाय दर्जाची सुरक्षा द्या

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**हिवरखेड:** अकोला पश्चिमचे आमदार साजीद खान पठाण यांना लॉरेन्स बिश्नोई टोळीतील शुभम लोणकर याने दहा कोटी रुपयांची खंडणी मागितली. खंडणी न दिल्यास ठार करण्याची धमकी दिली. ही घटना गंभीर राज्याच्या गृह विभागाने आमदार साजीद खान पठाण यांना वाय दर्जाची सुरक्षा प्रदान करावी अशी मागणी तालुका राष्ट्रीय कॉंग्रेस कमेटी अध्यक्ष गजानन वानखडे यांनी एका निवेदनातुन केली आहे.

त्यांनी शनिवारी ठाणेदार गजानन राठोड यांना निवेदन दिले. या निवेदनावार कॉंग्रेसचे नेते सुरेश गिन्हे, जमिरउल्लाखाँ पठान, मनीष भांबूरकर, हिफाजत खां, अब्दुल रज्जाक, अब्दुल आदिल, नागेश इंगळे, मो. यासीन नितीन वानखडे, नजर खॉन, अब्दूल सलमान, फाजील खान, योगेश गोमासे, मोहन सांगून वेळे, रामसिंग दहिकर हेमंत नागपुरे दिनेश मावशे, मुकुल भोपळे, संजय गिहे, नितीन भोपळे, संजय गावंडे राजू भाई खान आधी पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# कुटासा येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण



प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**कुटासा :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त कुटासा येथील बस स्टॉपवर आ. अमोल मिटकरी यांच्या पुढाकाराने उभारण्यात आलेल्या अष्टधातूतील १२ फूट उंच भव्य पुतळ्याचा अनावरण सोहळा गुरुवारी सायंकाळी जल्लोषात पार पडला. ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी नागरिक, युवक व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भगव्या पताका, ढोल-ताशांचा गजर आणि विविधांगी कार्यक्रम व जयजयकाराने परिसर दुमदुमून गेला. सायंकाळी ७ वाजता आ. अमोल मिटकरी यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. यावेळी गावासह परीसरातील प्रतिष्ठीत नागरीकांची उपस्थिती होती. अनावरण होताच उपस्थितांनी ‘जय भवानी, जय शिवाजी’च्या घोषणांनी वातावरण भारावून टाकले. तसेच सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. नागरिकांनी छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे दर्शन घेण्यासाठी एकच गर्दी केली होती तर गावात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते.

# संस्कृती संवर्धन समितीच्या संयोजकपदी समीर थोडगे यांची नियुक्ती



प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**अकोला :** संस्कृती संवर्धन समितीच्या संयोजकपदी समीर थोडगे यांची नियुक्ती करण्यात आली. समितीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये देशभक्तीची भावना दृढ करणे, तसेच भारतीय परंपरा, संस्कृती आणि सण-उत्सवांचे महत्त्व जागृत करणे हे प्रमुख उद्दिष्ट राहणार आहे. समाजात सांस्कृतिक जाणीव वाढवून एकात्मतेचा संदेश देण्याचा समितीचा प्रयत्न असतो. समीर थोडगे यांनी यापूर्वीही सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले असून विविध उपक्रमांच्या यशस्वी आयोजनात त्यांचा पुढाकार राहिला आहे. हिंदू नववर्ष स्वागत यात्रा, अखंड भारत दिन आणि महालक्ष्मी आरास स्पर्धा यांसारखे उपक्रम मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला १०० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आगामी काळात विविध सामाजिक, सांस्कृतिक व जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

नियुक्तीच्या प्रसंगी समिती अध्यक्ष प्रा. नितीन बाठे, माजी अध्यक्ष डॉ. आर. बी. हेडा, डॉ. पार्थ सारथी शुक्ल, अरविंद देठे, विनोद देव, निलेश देव, रामप्रकाशजी मिश्रा आणि महेश जोशी, यांच्यासह स्वानंद कोंडोलीकर, राम भिरड, मीनाक्षी अपोतीकर, शरद वाघ, सितल जैन, जस्मित ओबेरॉय, पंकज सहगल, रुपेश वाखारकर, अभय राजपूत, जय राणे, पंकज सादराणी, उपस्थित होते. या प्रसंगी समितीचे सदस्य नवनिर्वाचित नगरसेवक निलेश देव यांचा सत्कार करण्यात आला.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त न्यू इंग्लिश हायस्कूलचा शौर्यगाथा शिवबाची कार्यक्रम



प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**अकोला :** सांस्कृतिक कार्य संचालनालय व जिल्हा प्रशासनाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त १८ व १९ फेब्रुवारी रोजी शंकरलाल खंडेलवाल सभागृह येथे भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. न्यू इंग्लिश हायस्कूलच्या एकूण ५० विद्यार्थ्यांनी ‘शौर्यगाथा शिवबाची’ हा ३० मिनिटांचा प्रभावी कार्यक्रम सादर करत अलौकिक प्रयत्न साकारला. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील शिक्षकांचे सहकार्य लाभले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमिकेत शौर्य दिलीप सोनवणे, पराक्रम, तर अफजल खानाच्या भूमिकेत क्रिष्णा देविदास गिरी, शाहिस्तेखान म्हणून क्षितिज गोपाल लहाने, हिरकणीची भूमिका श्रेया राजेश जाधव हिने साकारली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन श्रीनिवास प्रशांत मोरे आणि कांचन पिंजरकर यांनी केले. विद्यार्थ्यांच्या दमदार सादरीकरणाला उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

नृत्य दिग्दर्शक सुमीत सराटे व माजी विद्यार्थीनी कु. दिव्या डहाके हिने केले तर मार्गदर्शक शिक्षक म्हणून सौ. दीपिका आगारकर, गोपाल सांगूनवेढे, सौ. किरण राठोड, सौ. वैशाली धबाले व तुषार उज्जनकर यांचे मार्गदर्शन तर मनोज वाकोडे, आनंद वाघमारे यांचे सहकार्य लाभले. मुख्याध्यापक माधव मुनशी, उपमुख्याध्यापक उदय हातवळने, पर्यवेक्षक हेमंत ओझरकर व अलका बाजरे यांनी व उपस्थित पालक, शिक्षक यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# काँग्रेसची रणशिंग फुंकण्याची तयारी; 24 फेब्रुवारीला कार्यकर्ता मेळावा

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**पुनित मजेठीया**

**आर्णी** : आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटन अधिक सक्षम करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने आर्णीत शक्तिप्रदर्शनाची तयारी सुरू केली आहे. आर्णी तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने मंगळवार, २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता राज पॅलेस (महावितरण कार्यालयाजवळ) येथे भव्य कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

### अनुभवाची जोड, जनाधाराचा आधार

■ माजी मंत्री शिवाजीराव मोघे यांचा प्रदीर्घ राजकीय अनुभव आणि स्थानिक प्रश्नांची जाण काँग्रेससाठी महत्त्वाची ठरणार आहे. तर, गेल्या विधानसभा निवडणुकीत जितेंद्र (बाळासाहेब) मोघे यांनी एक लाखाहून अधिक मते मिळवत आपले राजकीय वजन अधोरेखित केले होते. निसटता पराभव पत्करावा लागला असला, तरी मिळालेला मताधिक्याचा आकडा काँग्रेसच्या जनाधाराचे द्योतक मानला जात आहे.

या मेळाव्यात चंद्रपूर–आर्णी लोकसभा क्षेत्राच्या खासदार प्रतिभा धानोरकर आणि माजी मंत्री ॲड. शिवाजीराव मोघे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. गेली बारा वर्षे आर्णी–केळापूर विधानसभा मतदारसंघावर भाजपचे वर्चस्व राहिले असले, तरी अलीकडील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेसने आर्णी व घाटंजी नगरपरिषदांमध्ये नगराध्यक्षपद पटकावून राजकीय समीकरणात बदल घडवला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी पक्षाने तयारी सुरू केली आहे.

मेळाव्याला जिल्हाध्यक्ष प्रफुल मानकर, यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष मनीष पाटील, जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस जितेंद्र (बाळासाहेब) मोघे आदींची उपस्थिती अपेक्षित आहे. कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करणे आणि पक्षाची आगामी रणनीती स्पष्ट करणे, हा या मेळाव्याचा उद्देश असल्याचे पक्षाच्या वतीने सांगण्यात आले.

या मेळाव्यातून खासदार प्रतिभा धानोरकर कोणता राजकीय संदेश देतात आणि आगामी रणनीतीची रूपरेषा कशी मांडतात, याकडे मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.

# अमरावती विभागाचे राज्यस्तरावर नावलौकिक करावे : पालकमंत्री संजय राठोड

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**यवतमाळ** : यवतमाळ जिल्ह्याला यंदाच्या विभागीय महसूल महोत्सवाचे यजमानपद मिळाले असून शनिवारी जिल्हा क्रीडा संकुल येथे पालकमंत्री ना. संजय राठोड यांच्या हस्ते महोत्सवाचे थाटात उद्घाटन झाले. या महोत्सवांतर्गत विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा तीन दिवस (दि. २१, २२ व २३ फेब्रुवारी) सुरु राहणार आहेत.

पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी आपल्या भाषणात सांगितले, “महसूल विभागावर नेहमीच कामाचा ताण असतो; तरीही अधिकारी-कर्मचाऱ्यांनी दिलेल्या कामात तत्परता आणि प्रामाणिकपणा दाखवून महसूल यंत्रणेच्या विश्वासार्हतेत भर टाकली आहे.

या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांद्वारे महसूल परिवारातील संबंध दृढ होतील आणि लोकाभिमुख प्रशासनासाठी नवचैतन्य निर्माण होईल. सर्वांनी नवी ऊर्जा घेऊन अमरावती विभागाचे राज्यस्तरावर नावलौकिक करावे, हाच उद्देश आहे.”



उद्घाटन कार्यक्रमाला जिल्हाधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक कुमार चिंता, विभागीय अपर आयुक्त अजय लहाने, संजय जाधव, सुरज वाघमारे, अपर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, तसेच उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, महसूल संघटनांचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी आणि खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी विकास मीना म्हणाले की, “महसूल महोत्सवांतर्गत क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा महसूल विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव देते आणि आत्मविश्वास व समर्पणाची भावना जागृत करते.”

तीन दिवसांच्या महोत्सवात क्रिकेट, फुटबॉल, टेनिस, खो-खो तसेच पारंपरिक आदिवासी नृत्याद्वारे सांस्कृतिक सादरीकरण आयोजित करण्यात आले आहे. ध्वजारोहण व मशाल पेटवून महोत्सवाची सुरुवात करण्यात आली.

विशेष आकर्षण ठरले पथसंचलन स्पर्धेत यवतमाळ जिल्ह्याचा अव्वल क्रमांक. विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वाशिम जिल्ह्यांच्या महसूल विभागांनी सहभाग घेतला. पथसंचलनाला पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी मानवंदना दिली व यवतमाळ जिल्ह्याचा अव्वल क्रमांक जाहीर केला.

# माझी वसुंधरा : यवतमाळ नगर परिषदला राज्यस्तरीय द्वितीय पुरस्कार

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**यवतमाळ** : यवतमाळ नगर परिषदेला माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील १ लाख ते ३ लाख लोकसंख्या गटात पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी द्वितीय क्रमांकाचा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सन्मान मुंबईत आयोजित विशेष कार्यक्रमात देण्यात आला.

कार्यक्रमात राज्यातील अनेक मंत्री, वरिष्ठ अधिकारी आणि विविध नगरपरिषदेचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी पर्यावरण संवर्धनासाठी उल्लेखनीय काम करणाऱ्या संस्था व नगरपरिषदेचा गौरव करण्यात आला.



नगरपरिषदेच्या स्वच्छता, वृक्षारोपण, प्लास्टिक निर्मूलन, जलसंधारण व ऊर्जा बचत यासारख्या विविध पर्यावरणपूरक उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे हे सन्मान प्राप्त झाले. ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके यांच्या सक्षम नेतृत्वाखाली, मुख्याधिकारी शुभम क्यातमवार यांच्या मार्गदर्शनाने व संपूर्ण प्रशासनिक यंत्रणेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हे यश शक्य झाले.

नगरपरिषदेचे हे यश यवतमाळच्या हरित, स्वच्छ व पर्यावरणपूरक भविष्यासाठी प्रेरणादायी ठरले आहे.

# पालखी पदयात्रेत भक्तीचा जल्लोष





प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**आर्णी** : खेड ते माहूर अशी दरवर्षी निघणारी पारंपरिक पालखी पदयात्रा यंदाही २१ फेब्रुवारी रोजी भक्तीमय वातावरणात पार पडली. या पदयात्रेत राजेश आडे व नीता आडे यांनी सहभाग नोंदवत खेडवासीय भक्तांसमवेत पायी चालत माहूर गाठले.

टाळ-मृदुंगाच्या निनादात, जयघोष आणि नामस्मरणाच्या गजरात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. शिस्तबद्ध आयोजन आणि भाविकांचा उत्साह यामुळे पदयात्रेला विशेष रंगत आली. मार्गक्रमण करताना भक्तांनी एकोप्याचे दर्शन घडविले.

माहूर येथे पोहोचल्यानंतर भाविकांनी रेणुका माता मंदिर माहूर येथे जाऊन देवीचे दर्शन घेतले. मातेच्या चरणी नतमस्तक होत सर्वांच्या सुख-समृद्धी, उत्तम आरोग्य व सर्वांगीण प्रगतीसाठी प्रार्थना करण्यात आली.

अशा धार्मिक परंपरांमुळे समाजात श्रद्धा, एकात्मता आणि आध्यात्मिक बळ अधिक दृढ होत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# ट्रॅक्टरच्या धडकेत दुचाकीस्वार जागीच ठार

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**उमरखेड** : ब्राम्हणगाव–हिमायतनगर मार्गावरील कोपरा (बु) जवळ दुपारी सुमारास झालेल्या भीषण अपघातात ३५ वर्षीय दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. ही घटना दुपारी १ वाजण्याच्या सुमारास घडली.

एमएच २९ सीजे ७९०४ क्रमांकाच्या ट्रॅक्टरने एमएच २९ बीए ८४८५ क्रमांकाच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेत कोपरा (बु) येथील विजय प्रल्हाद वाठोरे (वय ३५) यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली.




घटनेची माहिती पोलीस पाटील सुनील देवसरकर यांनी उमरखेड पोलीस ठाण्यास कळविली. त्यानंतर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. ठाणेदार शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# जिजामाता महाविद्यालयात शिवजयंती साजरी

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**दारव्हा** : येथील जिजामाता कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व इतिहास विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य अविनाश जिद्दीवार अध्यक्ष म्हणून उपस्थित होते, तर मार्गदर्शक म्हणून पिंगळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यादव सोळंके यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी शिवरायांच्या शौर्य, कर्तृत्व व



राष्ट्रनिर्मितीतील योगदानावर प्रकाश टाकण्यात आला.

कार्यक्रमाचे संचालन कु. वैष्णवी नाटकरनी यांनी केले. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रामधन हिरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन पायल राठोड यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. पुरुषोत्तम बांडे, डॉ. जयवंत जुकरे, डॉ. प्रीती ठाकरे, डॉ. राजेश गेडाम, सचिन माटोळे, सतीश सरतापे, सोमराज लोहकरे, पायल पवार, उत्कर्ष जाधव, राहुल आडे, प्रथमेश आडे, विशाल उमरे, जानवी गुल्हाने, शारदा भगत, रिद्धी आवारे, कोमल लोहकरे, प्रीती राठोड, वैष्णवी राठोड आदींचे सहकार्य लाभले.

# बाभूळगाव तालुक्याची ‘मृदगंध’मध्ये कमाल; पथसंचलनात प्रथम, कबड्डी–बुद्धिबळातही सुवर्ण–रौप्य!

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**बाभूळगाव** : महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत यवतमाळ येथील नेहरू स्टेडियम परिसरात १३ ते १५ फेब्रुवारी दरम्यान आयोजित ‘मृदगंध’ कला व क्रीडा स्पर्धेत बाभूळगाव तालुक्याने नेत्रदीपक कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधले आहे. तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सांघिक तसेच वैयक्तिक स्तरावर उत्कृष्ट प्रदर्शन करत अनेक पुरस्कार पटकावले.

स्पर्धेच्या उद्घाटन दिवशी झालेल्या पथसंचलन कार्यक्रमात ‘शिवकालीन महाराष्ट्र’ हा देखावा सादर करत बाभूळगाव तालुक्याने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळवला. हा आकर्षक व ऐतिहासिक सादरीकरण सर्वांच्या मनावर ठसा उमटवणारा ठरला.



क्रीडा स्पर्धांमध्येही तालुक्याने आपली छाप पाडली. कबड्डी स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवत रौप्य पदक पटकावले. बुद्धिबळ स्पर्धेत कु. अनुश्री खडसे यांनी प्रथम क्रमांक मिळवला. लांब उडी व कबड्डीमध्ये हरी देशमुख यांनी उत्कृष्ट रेडर म्हणून विशेष गौरव प्राप्त केला. रनिंग स्पर्धेत सुरज सांडे यांनी द्वितीय क्रमांक, तर गोळाफेक स्पर्धेत दत्तात्रय चेंडके यांनी प्रथम क्रमांक पटकावत तालुक्याचा मान उंचावला.

या यशस्वी सहभागामागे तालुका कृषी अधिकारी कु. ऋतिका डेरे, मंडळ कृषी अधिकारी सुरेश गावंडे, सहाय्यक कृषी अधिकारी उमेश बांगडकर तसेच कृषी विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमांचा वाटा आहे. त्यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे बाभूळगाव तालुक्याने स्पर्धेत अव्वल कामगिरी केली.

तालुका कृषी अधिकारी ऋतिका डेरे यांनी सांगितले, “मृदगंध कला व क्रीडा स्पर्धेत मिळालेले हे यश बाभूळगाव तालुक्यातील कृषी विभागाच्या एकजुटीचे आणि जिद्दीचे प्रतीक आहे. दैनंदिन कामाच्या जबाबदाऱ्यांसोबत कला व क्रीडा क्षेत्रातही उत्कृष्ट कामगिरी करून तालुक्याचा गौरव वाढवला आहे. ‘संघभावना, शिस्त आणि सकारात्मक ऊर्जा’ यांच्या जोरावर हे यश शक्य झाले. भविष्यातही अशाच उत्साहाने सहभाग नोंदवून राज्यस्तरावर बाभूळगावचे नाव झळकवण्याचा आमचा निर्धार आहे.”

या यशाने कृषी विभागातील कर्मचाऱ्यांमध्ये नवीन ऊर्जा निर्माण झाली असून, भविष्यातील स्पर्धांसाठीही प्रेरणा मिळाली आहे. बाभूळगाव तालुक्याच्या या कामगिरीचे जिल्हा व राज्य स्तरावर कौतुक होत आहे.

# निर्णयावेळी साथ, नंतर आरोप

## जीन प्रेसचा कारभार पारदर्शक असल्याचा दावा

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**उमरखेड** : निर्णय प्रक्रियेत सहभागी राहून त्यावेळी कोणताही आक्षेप नोंदवला नाही आणि नंतर पत्रकार परिषद घेऊन बिनबुडाचे आरोप करणे चुकीचे असल्याचे प्रतिपादन भाजप जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनी केले. येथील सहकार महर्षी भाऊसाहेब माने शेतकरी सहकारी जीनिंग अँड प्रेसिंग संस्था येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

संस्थेतील काही संचालकांनी अलीकडेच कारभारावर प्रश्न उपस्थित केले होते. त्यावर स्पष्टीकरण देताना भुतडा म्हणाले की, अपुरे मनुष्यबळ लक्षात घेता १४ दुकान गाळ्यांचे बांधकाम कंत्राट पद्धतीने देण्याचा ठराव २० डिसेंबर २०२५ रोजी सर्वानुमते मंजूर करण्यात आला. अधिकृत अभियंत्यांच्या अंदाजपत्रकानुसार प्रति चौ. फूट दर



१,९१६ रुपये असताना प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दर सुमारे १३ टक्क्यांनी कमी होता. संचालक मंडळाच्या सूचनेनुसार वाटाघाटी करून दरात आणखी २५ रुपये प्रति चौ. फूट कपात करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. ८७५ रुपये प्रति चौ. फूट दराची कोणतीही निविदा आलेली नसताना तसे आरोप करून संस्थेची बदनामी करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

कर्मचारी ग्रॅच्युइटी व रजा रोखीकरणाबाबत सर्व देयके संचालक मंडळाच्या ठरावानुसार व Payment of Gratuity Act, 1972 प्रमाणे अदा करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले. दरवर्षी १५ दिवसांच्या वेतनाच्या प्रमाणात ग्रॅच्युइटी देण्यात आली असून रजा रोखीकरण कमाल ३०० दिवसांच्या मर्यादितच करण्यात आले आहे. संस्था नफ्यात असून नुकसान झाल्याचे दावे निराधार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कापूस प्रक्रियेबाबतच्या आरोपांवर विजय माने यांनी स्पष्टीकरण देताना सांगितले की, चालू हंगामात प्रक्रिया सुरू ठेवण्यासाठी प्रयत्न झाले. मात्र Cotton Corporation of India (CCI) डिपॉझिट संदर्भातील सभेला संबंधित सदस्य अनुपस्थित राहिल्याने गणपूर्तीअभावी निर्णय होऊ शकला नाही. नंतर CCI ने मुदतवाढ दिल्यानंतर संस्थेने वेळेत डिपॉझिट भरले.

जिनिंग युनिटमध्ये आवश्यक सुधारणा व संभाव्य उत्पन्नाचा अभ्यास करता प्रति गठाण १,४५० रुपये दर मिळाल्यास प्रक्रिया परवडणारी होती; मात्र १,४०० रुपयांपेक्षा कमी दर निश्चित झाल्याने आर्थिक नुकसान टाळण्यासाठी प्रक्रिया पुढे नेण्यात आली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संस्था सहकार तत्त्वांनुसार पारदर्शक व जबाबदार कारभार करण्यास कटिबद्ध असून सभासदांनी अधिकृत नोंदींवर विश्वास ठेवावा, असे आवाहन पत्रकार परिषदेत करण्यात आले.

# ६ वर्षीय अरशदचा पहिला रोजा

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**आर्णी** : पवित्र रमजान महिन्याला प्रारंभ झाल्यानंतर मुस्लिम बांधवांकडून रोजा (उपवास) पाळण्यास सुरुवात झाली आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण ईश्वरप्रार्थनेत रमले असून शहरातील शास्त्रीनगर भागातील ६ वर्षीय अरशद जाहीर साकले याने पहिल्यांदाच रोजा ठेवत सर्वांचे लक्ष वेधले आहे.



तब्बल सुमारे १४ तास अन्न-पाणी न घेता उपवास करत अरशदने सायंकाळी साडेसहा वाजता रोजा सोडला. एवढ्या लहान वयात पहिला रोजा पूर्ण केल्याबद्दल त्याचे शास्त्रीनगर परिसरासह आर्णी शहरात सर्वत्र कौतुक होत आहे. रमजान महिन्यात ३० दिवस रोजा ठेवून मुस्लिम बांधव ईश्वराकडे प्रार्थना करतात. या पार्श्वभूमीवर अरशदच्या निर्धाराचे नागरिकांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# 'नंददीप'च्या संदीप व नंदिनी शिंदे यांचा सोमवारी नागरी सत्कार



प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**यवतमाळ** : बेघर आणि निराधार मनोरुग्णांच्या सेवेसाठी आपले आयुष्य समर्पित करणारे नंददीप फाउंडेशनचे संस्थापक संदीप शिंदे व नंदिनी शिंदे यांचा यवतमाळकरांच्या वतीने नागरी सत्कार आयोजित करण्यात आला आहे.

संत गाडगे बाबा जयंतीचे औचित्य साधून, सोमवार, २३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता स्थानिक सावरकर मैदान (रंगोली मैदान) येथे हा सोहळा पार पडणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विजय कावलकर राहणार असून, यावेळी संतोष अरसोड प्रमुख वक्ता म्हणून उपस्थित राहतील.

हाँगकाँग रोटरीतर्फे 'द वन इंटरनॅशनल' या जागतिक पुरस्कारासह अनेक राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित शिंदे दाम्पत्याच्या कार्याचा गौरव करून यवतमाळच्या कर्तृत्वाचा सन्मान करण्यासाठी व संदीप शिंदे यांच्या कार्यास संवेदनशील समाजमनाची मदत व्हावी, यासाठी हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. याशिवाय आजच्या तरुणांसमोर संदीप शिंदे यांचे व्यक्तिमत्त्व एक 'युथ आयडॉल' म्हणून स्थापित व्हावे, ही आयोजकांची भावना आहे. यवतमाळच्या मातीतील हे सेवाकार्य जागतिक स्तरावर पोहोचले आहे. या कार्याला दाद देण्यासाठी सर्व यवतमाळकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन नागरी सत्कार समिती व विविध संस्था, संघटनांच्या वतीने करण्यात आले आहे.

### पुरस्कारांचे प्रदर्शन

■ कार्यक्रमस्थळी नंददीप फाउंडेशनला आजवर मिळालेले सर्व पुरस्कार, मानपत्रे आणि स्मृतीचिन्हे यांचे विशेष दालन उभारले जाणार आहे. संस्थेच्या आजवरच्या संघर्षाचा आणि सेवाकार्याचा प्रवास उलगडणारा माहितीपट यावेळी उपस्थितांना पाहता येईल, असे आयोजकांनी कळविले आहे.

सिटी न्युज सुपरफास्ट वाशीम

रविवार दि. २२ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# फोकस

● अतिष देशमुख @ वाशीम ●

## वाशीम शहरात...

# कस राहवं, काय करावं, जगावं की मरावं...!

## मुलभूत सुविधांचा अभाव, कसा होणार निभाव

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

विकासाच्या नावावर हजारो कोटीचे कामे करूनही शहर भकास झाले आहे. नागरिकांना मुलभूत समस्यांनाही सामोरे जावे लागत आहे. घरकूल उभारूनही गरीबांना राहण्यासाठी घरे न दिल्याने घरकुल घोटाळा झाला आणि घरकुल ढासळले. पाच वेळा कागदोपत्री रस्ते करूनही नागरिकांचे जीवनच खड्ड्यात गेले आहे. घंटा गाडीच्या तंट्याने जीवनाचा कचरा झाला आहे. दहा दिवसाआड गढुळ पाण्याने आरोग्य धोक्यात आले आहे. शहरात सध्या ही खूप प्रश्न आहेत. गुंठेवारीची खरेदी विक्री बंद आहे. सिग्नलही बंद अवस्थेत आहेत. भूमीगत गटार योजना गटारातच गेली आहे. भ्रष्टाचाराचे अपूर्ण नाट्यगृह, सिटी हॉल, नागरिकांकडून हजारो रुपयांची पठाणी वसुली करून त्यांच्या माथी मारलेल्या नळाच्या मिटरला आठवड्यातून एक दिवस येणारे दूषित पाणी, रखडलेला ओसाड झालेले महात्मा फुले व लोकमान्य टिळक गार्डन, संपूर्ण शहरातील स्वच्छतागृहाची अवस्था, धन धन दांडग्यांची असलेली अतिक्रमण, असे अनेक विषय पुढाकाराने घेवून राजकारण्याने श्रेयवादासाठी का होईना अपूर्ण राहीलेले कामे पुर्ण करावे आणि शहरासोबतच जिल्ह्याचा विकासाचा मार्ग काढावा अशी मागणी होत आहे. निवडणुकीत नागरिकांना चकाचक रस्ते, २४ तास पाणी, भूमिगत गटार योजना, घरकूल, असे अनेक आश्वासनाचे गांजर देवून विजयाची पुंगी वाजविली असली तरी कुठे झाला विकास, शहर झाले भकास, नगरसेवक व लोकप्रतिनिधी झकास अशी परिस्थिती वाशीम शहरासह जिल्ह्यातील इतर शहरांचीही झाली आहे.

### १) गरींबाना घरे दिले नाहीत
#### घरकुल घोटाळा

वाशीम शहरातील पंचशिल नगरात गरीबांसाठी १६४ कोटी रूपयांचे शेकडो घरकूले बांधण्यात आले. या घरकुलात घोटाळा झाला असून गरीबांना घरकुले देण्यापूर्वीच हे घरकुले ढासळून कोसळले आहेत..

### २) राहायला जागा देत नाहीत.
#### भुखंडाची खरेदी विक्री बंद

१२ वर्षापूर्वी भुखंडाची खरेदी विक्री बंद करून गरीबांना राहायला जागा देत नसल्याने भू-माफियांनी प्लॉटचे भाव अव्वाच्या सव्वा केले आहेत. घरकुलही नाही, राहायला जागाही देत नसल्याने जागाव की मराव...

### ३) दररोज पाणी देत नाहीत
#### १०दिवसाआड गढुळ पाणी पुरवठा

शहरात पावसाळयातही १० दिवसाआड गढूळ पाणी पुरवठा होत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शिवाय जुनीच पाईप लाईन दाखवून नवीन योजनेचे पैसे उखळल्याने नागरिकांना दररोज पाणी देत नाहीत...

### ४) चालयला रस्ते नाहीत
#### नागरिकांचे जीवनच खड्ड्यात

१२ वर्षात भूमीगत गटार योजनेच्या अगोदर दोन वेळा नंतर वेळा आता १ वेळा असे पाच वेळा ८०० कोटी रूपयांचे रस्ते होवूनही नागरिकांचे जीवन खड्ड्यातच गेले आहेत. नागरिकांना चालयला रस्तेच नाहीत...

### ५) रस्त्यावर लाईट नाहीत
#### नागरिकांचे जीवनच अंधारात

वाशीम शहरातील रस्त्यावर स्ट्रीट लाईट नसल्याने नागरिकांना रात्री अंधारातच बाहेर पडावे लागते. त्यामुळे अनुचित घटना घडत आहेत. लाईट असूनही दुरूस्ती न केल्याने कागदोपत्री पैसे काढल्याने नागरिकांचे जीवन अंधारातच जात आहे...

### ६) वस्तीमध्ये नाल्या नाहीत
#### नागरिकांचे जीवनच गटारमय

वाशीम शहरातील शेकडो कोटी रूपये खर्च करून भूमीगत गटार योजना राबविण्यात आली. या योजनेत भ्रष्टाचार करून गटार खाल्याने गटार योजनेचे पाणी रस्त्यावर येत असल्याने नागरिकांचे जीवन गटारात गेले असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे...

### ७)शहरात घाणच घाण
#### घंटागाडीला भ्रष्टाचाराचा मान

वाशीम शहरातील स्वच्छतेचे तिनतेरा वाजले असून जिकडे तिकडे घाणच घाण पसरली आहे. नाले सफाई रखडली असून नाल्याचे पाणी रस्त्यावर येत असून घंटा गाडीला भ्रष्टाचाराचा मानच मिळाला आहे. शहरात मात्र घाणच घाण आहे...







जिल्ह्यातील सहाही शहरांतर्गत नागरिकांना अपेक्षित मुलभूत सुविधा पुरविण्याकडे त्या-त्या नगर परिषदांचे दुर्लक्ष होत आहे. त्यात प्रामुख्याने सार्वजनिक स्वच्छतागृह, महिला प्रसाधनगृह, पिण्याचे पाणी, दर्जेदार रस्ते अशा सुविधांचा समावेश आहे. अकोला जिल्ह्यातून विभक्त होत १ जुलै १९९८ रोजी वाशिम जिल्ह्याची निर्मिती झाली. ७९३ महसूली गावे आणि सहा शहरे मिळून निर्माण झालेल्या या जिल्ह्यात वाशिम, रिसोड, मंगरूळपीर आणि कारंजा या चार नगर परिषद; तर मालेगाव आणि मानोरा येथे नगर पंचायत कार्यान्वित आहे. दरम्यान, किमान शहरांच्या ठिकाणी प्रमुख चौकांमध्ये सार्वजनिक स्वच्छतागृह, महिला प्रसाधनगृह, सीसीटीव्ही कॅमेरे, सिग्नल व्यवस्था, पिण्याचे स्वच्छ पाणी अशा मुलभूत सुविधा मिळणे नागरिकांना अपेक्षित आहे. मात्र, वर्षाकाठी या सुविधांकरिता शासनाकडून मिळणारा कोट्यवधी रुपयांचा निधी आणि नागरिकांकडूनही करापोटी वसूल केल्या जाणाऱ्या निधीमधून ही कामे केली जात नसल्याची ओरड सर्वच स्तरांतून होत आहे. नगर परिषदांनी याकडे लक्ष पुरवावे, अशी मागणी जोर धरत आहे. प्रसाधनगृहांअभावी महिलांची प्रचंड हेळसांड समाजातील पुरूष मंडळी कुठेही आडोशाला जावून लघुशंका उरकू शकतात. मात्र, महिलांसाठी ही बाब कदापि शक्य नाही.

त्यामुळे शहरांतर्गत वर्दळीच्या मुख्य चौकांमध्ये स्वतंत्र महिला प्रसाधनगृह असणे आवश्यक आहे. मात्र, जिल्ह्यातील एकाही नगर परिषदेने ही सुविधा अद्याप उभी केलेली नाही. परिणामी, प्रसाधनगृहांअभावी महिलांची प्रचंड हेळसांड होत असल्याचे दिसून येत आहे.













## 'सिटी न्युज सुपरफास्ट' चा सततचा पाठपुरावा...

सर्व सामान्यांच्या समस्यांसाठी सांध्य दैनिक सिटी न्युज सुपरफास्ट शासन दखल घेईपर्यंत सततचा पाठपुरावा करीत असते. त्यामुळेच १३ वर्षात लोकांच्या मनामनातून घराघरात सिटी न्युज सुपरफास्ट पोहोचला आहे. शहरातील विविध समस्यांच्या प्रत्येक विषयांच्या हजारो वृत्त मालिकेची श्रृंखला सिटी न्युज सुपरफास्टने लावून धरली आहे. शहरातील समस्यांसाठी सदैव प्रथम पुढाकार घेवून समस्या मार्गी लागेपर्यंत सततचा पाठपुरावा करीत असल्याने सिटी न्युज सुपरफास्टने जनसामान्यांच्या मनात घराघरात स्थान निर्माण केले आहे. त्याचाच परिणाम म्हणून समस्यांच्या वृत्तांच्या कात्रनाचे बॅनर शहरात आंदोलनाच्या वेळी लागत असतात.







## शहरातील समस्यांच्या 'सिटी न्युज सुपरफास्ट'ने खालील बातम्यांची वृत्त मालिका चालविली आहे

१) नागरिकांचे जीवनच गेले 'खड्ड्यात'
२) भूमीगत गटार योजना 'गटारातच'
३) टेंपल गार्डचा भ्रष्टाचार 'उघड'
४) नाट्य गृहाच्या भ्रष्टाचाराचे 'नाट्य'
५) घंटा गाडीमुळे नगरसेवकातच 'तंटा'
६) स्वच्छतेचे तिनतेरा, वाजले 'बारा'
७) २४ तास पाण्याचे आश्वासन हवेतच 'विरले', पाणी जमिनीतच 'मुरले'
८) गुंठेवारीची खरेदी विक्री प्रक्रिया बंदच
९) ट्रॉफिक सिग्नल जोडले, अन् नाही पडले
१०) प्रक्रिया विना खाल्ला कचरा
११) घरकुल घोटाळा, पैसा केला गोळा
१२) तारागण अन् भ्रष्टाचाराचे अंगण

### ८)सिग्नल जोडले, नाही पडले
#### शहरात वाहतुकीचे तिनतेरा

शहरात सिग्नल व्यवस्था बसविण्यात आली असली तरी भ्रष्टाचारामुळे हे सिग्नल अद्यापही पडले नाहीत. त्यामुळे वाहतुक व्यवस्थेचे तिनतेरा वाजले आहेत. जुने सिग्नल लावून नवीन सिग्नलचे पैसे उखळण्यात आले आहे.

### ९)टेपल गार्डन भकास...
#### भ्रष्टाचार करून अधिकारी झकास

वाशीम शहरात १० वर्षापूर्वी अकोला नाका परिसरात टेपल गार्डन उभारण्यात आले. भ्रष्टाचाराच्या प्रक्रियेनंतर तारांगणाचे लोकार्पणही झाले मात्र टेपल गार्डन सुरू होण्यापूर्वीच भकास झाले अधिकारी भ्रष्टाचार करून झकास आहेत...

### १०)तारांगण अन् भ्रष्टाचाराचे अंगण
#### जाळले की जळले कारण नाही कळले

शहरात टेपल गार्डन परिसरात तारांगण उभारण्यात आले. तारांगणाचे पालकमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पणही झाले. मात्र जनतेसाठी खुले करण्यापूर्वीच जाळण्यात आले. हे तारांगण जाळले की जळले त्याचे कारणही अद्यापही कळले नाही...

### ११)भ्रष्टाचाराचे नाट्य गृह
#### भ्रष्टाचाराचा गुरू अद्यापही नाही सुरू

अकोला नाका परिसरात करोडो रूपये खर्च करून नाट्य गृह बांधण्यात आले. या नाट्य गृहासाठी कोट्यवधी रूपयाचा निधी मिळूनही भ्रष्टाचारामुळे १२ वर्षापासून हे नाट्यगृह अद्यापही सुरू झाले नाही. यामागचे खरे गुरू कोण आहेत नाट्य गृह केंव्हा सुरू होणार याकडे जनतेचे लक्ष लागले आहे...

### १२)साहेब पार्कींगच्या जागा गायब
#### पार्कींगच्या जागेवरअतिक्रमण

शहरात असलेल्या पार्कींगच्या जागेवर धनधागड्यांनी अतिक्रमण केल्याने पार्कींगच्या जागा गायब झाल्या आहेत. पाटणी चौकासह शहरातील मुख्यचौकात वाहने रस्त्यावरच उभी करण्यात येत आहेत. त्यामुळे वाहतूकीस अडथळा निर्माण होत आहे.

### १३)प्रक्रिया न करता खाल्ला कचरा
#### दररोज डम्पिंग गाऊडला लागते आग

शहरात संकलीत केलेल्या कचऱ्यावर आजपर्यंत १२ वर्षात कधीच प्रक्रिया झाली नाही. भ्रष्टाचाऱ्यांनी प्रक्रिया न करता कचरा खाल्याने दररोज डम्पिंग गाऊंडला आग लावत आहेत. या आगीमुळे परिसरात प्रदुषण होत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे...

### १४) रस्त्यावरच अतिक्रमण
#### नागरिकांनी कसे करावे भ्रमण

शहरात धनधागड्यांनी रस्त्यावर अतिक्रमण केले आहे. अतिक्रमण हटाव मोहीम फक्त गरीबांचेच अतिक्रमण हटविते. शहरात मात्र धनधागड्यांनी पक्के अतिक्रमण केले आहे. ते अतिक्रमण अद्यापही पडले नसल्याने आधी पक्के पाडा नंतर गरीबांचे काढा...









सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# मुलीच्या लग्नापूर्वीच पित्याची एक्झिट

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**मालेगाव:** मुलीच्या लग्नाला अवघे २० दिवस राहिले असताना, लग्नाची खरेदी करण्याच्या दिवशीच एका हतबल पित्याने मृत्यूला कवटाळल्याची धक्कादायक घटना मालेगाव तालुक्यातील पांगरी नवघरे येथे घडली आहे. राजू कालापाड असे या दुर्दैवी शेतकऱ्याचे नाव असून, कर्ज आणि पिकांच्या नुकसानीमुळे त्यांनी आपल्याच शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेमुळे लग्नाच्या घरात आनंदाऐवजी शोककळा पसरली आहे.

?राजू कालापाड यांच्या मुलीचे लग्न १४ मार्च रोजी ठरले होते. आज लग्नाचे साहित्य आणि संसारोपयोगी वस्तू खरेदी करण्यासाठी ते जाणार होते. मात्र, घराची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट होती. राजू यांच्याकडे केवळ १ एकर शेती असून,

## ♦ कर्जबाजारी शेतकऱ्याची शेतातच आत्महत्या



निसर्गाच्या लहरीपणामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले होते. कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी ते आपल्या पत्नीसह पुणे येथे मजुरीसाठी सुद्धा गेले होते. मुलीचे लग्न ठरल्यानंतर ते गावी परतले, मात्र डोक्यावर असलेल्या कर्जाच्या डोंगरामुळे ते सतत विवंचनेत असायचे.

आज मुलीच्या लग्नासाठी लागणारे साहित्य खरेदी करायचे होते, परंतु खिशात पैसे नसल्याने आणि साहित्याची जुळवाजुळव होत नसल्याने राजू कालापाड पूर्णपणे खचून गेले होते. याच नैराश्यातून त्यांनी शेतात जाऊन झाडाला गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवली. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी आणि दोन लहान मुले असा परिवार आहे. ज्या मुलीची डोली उठणार होती, त्याच मुलीला आपल्या पित्याची अंत्ययात्रा पाहण्याची वेळ आल्याने संपूर्ण गाव हळहळत आहे. 'कुटुंबावर कोसळलेला हा दुःखाचा डोंगर मोठा असून, आता शासनाने आणि प्रशासनाने मदतीचा हात द्यावा,' अशी आर्त हाक पीडित कुटुंबाकडून दिली जात आहे. घटनेची माहिती मिळताच मालेगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेहाचा पंचनामा करून उत्तरीय तपासणीसाठी (इद्रे-स्द्रीस) मृतदेह शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. मालेगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी या घटनेबाबत अधिक माहिती दिली असून पुढील तपास सुरू आहे.

# बारावीच्या विद्यार्थिनीने चक्क रूग्णालयातून दिली परीक्षा!

## विद्यार्थिनीच्या भविष्यासाठी यंत्रणा धावली

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी



**मूर्तिजापूर :** तालुक्यातील हिरपूर येथील बारावीच्या परीक्षा केंद्रावर २१ फेब्रुवारीला गणिताचा पेपर होणार होता. तत्पूर्वी १० मिनीट आधीच परीक्षा केंद्रात प्रवेश करतानाचा एका विद्यार्थिनीला भोवळ येऊन ती बेशुद्ध पडली. लगेच कर्मचारी व पालकांनी तिला रूग्णालयात भरती केले. विद्यार्थीनीचे वर्ष वाया जाऊ नये म्हणून सर्वच यंत्रणा हलली आणि वरिष्ठ स्तरावर चर्चा करीत तिला रूग्णालयातून बंदोबस्तात परीक्षा देण्याची परवानगी देण्यात आली.

मूर्तिजापूर तालुक्यातील हिरपूर येथील अनंतराव देशमुख ज्युनिअर कॉलेजमध्ये २१ फेब्रुवारीला इयत्ता बारावीचा गणित विषयाचा पेपर होता. ११ वाजता पेपरला सुरूवात होणार असल्याने सर्व विद्यार्थी १०.३० वाजता परीक्षा केंद्रावर हजर होते. यावेळी विद्यार्थिनी श्रेया गुणवंत देशमुख (बैठक क्र. व्हीओ १४९८६) हिची प्रकृती अचानक १०.५० वा. बिघडली. तिला भोवळ (चक्कर) येऊन ती बेशुद्ध पडली. यावेळी परीक्षा केंद्रावरील कर्मचारी व पालकाने तिला तातडीने रूग्णालयात भरती केले. तसेच तिच्या पेपरविषयी परीरक्षक केंद्राला मार्गदर्शन मागितले.विभागीय अध्यक्ष संदीप सांगवे यांच्याशी दूरध्वनीवरून मार्गदर्शन घेऊन ठिक ११.४० रूग्णालयात जाऊन विद्यार्थिनीशी चर्चा करून तिची तब्येत ठिक आहे का विचारले. तसेच तू पेपर देण्याच्या मनस्थितीत आहे का, असे विचारताच तिने होकार दिल्याने सर्व यंत्रणा कामाला लागली. लगतचे परीक्षा केंद्र श्री गाडगे महाराज विद्यालय मूर्तिजापूर येथून गोपनीयतेचा भंग न होऊ देता महिला पोलिस बंदोबस्तामध्ये ११.५० वा. रूग्णालयात श्रेयाला पेपर सोडविण्याकरिता प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका देण्यात आली. यावेळी महिला पोलिस कर्मचारी सरला पारोदे, व पर्यवेक्षक ढोकणे यांची पूर्णवेळ नियुक्ती करण्यात आली. तसेच परिरक्षक वैशाली रामटेके व उपपरिरक्षक मोहम्मद इब्राहीम अली यांनी स्वत: उपस्थित राहून सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या निगराणीत रूग्णालयात विद्यार्थिनीने पेपर सोडविली. यामुळे एका विद्यार्थीनीचे एक वर्ष वाया जाण्यापासून वाचल्याने पालकांनी सर्वच यंत्रणेचे आभार मानले.

# हे खोदकाम अधिकृत की अनधिकृत?

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**अकोला :** शहरातील जठारपेठ परिसरात ब्राह्मण सभा सावरकर सभागृहासमोर आणि जी बाजारसमोरील सरकारी जागेत बोअरवेलचे खोदकाम करण्यात आल्याची बाब समोर आली आहे. हे खोदकाम अधिकृत आहे की अनधिकृत, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. अकोला शहरातील जठारपेठ परिसरात ब्राह्मण सभा सावरकर सभागृहासमोरील जी बाजारजवळील सरकारी जागेत अलीकडेच बोअरवेलचे खोदकाम करण्यात आले आहे. मात्र या खोदकामासाठी संबंधित विभागाची परवानगी घेण्यात



आली आहे का, याबाबत स्पष्टता नसल्याने स्थानिक नागरिकांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. सरकारी जागेत कोणत्याही प्रकारचे बांधकाम किंवा खोदकाम करण्यासाठी प्रशासनाची पूर्वपरवानगी आवश्यक असते. मात्र येथे कोणतीही अधिकृत माहिती फलक किंवा परवानगीचा तपशील दिसून येत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.जर हे खोदकाम अनधिकृत असेल तर संबंधितांवर कारवाई होणार का? आणि अधिकृत असेल तर त्याबाबत प्रशासनाकडून स्पष्ट माहिती का देण्यात आलेली नाही? असा सवालही नागरिक उपस्थित करत आहेत. प्रशासनाने या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून अधिकृत-अनधिकृत स्थिती स्पष्ट करावी आणि आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी स्थानिकांकडून केली जात आहे

# आज मोठ्या राम मंदिरात नैसर्गिक रंगाची होळी

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**अकोला :** राजराजेश्वर नगरीत संत गजानन महाराजांचा पावन स्पर्श लाभलेल्या मोठ्या राम मंदिरात २२ फेब्रुवारी रोजी दुपारी चार ते सहा वाजे पर्यंत चंग सोबत नैसर्गिक होळीचा कार्यक्रम होणार आहे. गुलाल, फूले आणि नैसर्गिक रंग उधळले जातात. अतिशय सुंदर असा कार्यक्रम असतो.हा कार्यक्रम श्रीराम हरीहर संस्थान, पुष्करणा चेतना समिती, राधा कृपा सत्संग मंडळ, श्री जानकी वल्लभो धर्मार्थ संस्थेच्या वतीने आयोजिला आहे. यात सहभागी व्हावे असे आवाहन गिरीश जोशी आणि सहका-यांनी केले आहे.

# जेके मॅक्स पेंटच्या नवीन उत्पादनाचे दिमाखदार अनावरण

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

## ♦ लक्झरी कॅटेगरीमधील 'मॅजेस्टा टू शाइन' आता अकोल्यात उपलब्ध

**अकोला :** घर किंवा कार्यालयाच्या सौंदर्यात भर टाकण्यासाठी जगप्रसिद्ध जेके मॅक्स पेंट तर्फे लक्झरी कॅटेगरीमधील 'मॅजेस्टा टू शाइन' या नवीन उत्पादनाचे अनावरण शहरातील प्रतिष्ठित 'मॉडर्न पेंट' या दुकानात करण्यात आले. या सोहळ्याला जेके मॅक्स पेंटचे वरिष्ठ अधिकारी, शहरातील नामांकित पेंटिंग कॉन्ट्रॅक्टर, पेंटर्स आणि प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




जेके मॅक्स पेंट हे रंगांच्या दुनियेतील एक अग्रगण्य आणि विश्वसनीय नाव आहे. हे ब्रँड घराच्या अंतर्गत आणि बाहेरील भिंतींसाठी टिकाऊ, इको-फ्रेंडली आणि उच्च गुणवत्तेचे पेंट्स प्रदान करते. डाग-प्रतिबंधक आणि अतिनील किरणांपासून संरक्षण देणाऱ्या प्रगत तंत्रज्ञानासाठी हा ब्रँड ओळखला जातो, ज्यामुळे घरांची आणि औद्योगिक ठिकाणांची चमक दीर्घकाळ टिकते. इतर कंपन्यांच्या तुलनेत जेके मॅक्स पेंटने ग्राहकांचा मोठा विश्वास संपादन केला असून, त्यांची लोकप्रियता सातत्याने वाढत आहे. अकोल्यातील मॉडर्न पेंट येथे जेके मॅक्स पेंटची विस्तृत श्रेणी उपलब्ध आहे. आज येथे 'मॅजेस्टा टू शाइन' या लक्झरी पेंटचे ढोल-ताशांच्या गजरात दिमाखदार अनावरण करण्यात आले. मॉडर्न पेंटचे संचालक असलम खान आणि इम्रान खान यांनी या नवीन उत्पादनाचे स्वागत केले. भिंतींना रेशमी आणि आकर्षक चमक देते, हजारावर रंगछटांमध्ये उपलब्ध, अत्यंत टिकाऊ आणि स्वच्छ करण्यास सोपे तसेच घराच्या सौंदर्यात भर घालणारे उत्पादन आहे. या प्रसंगी जेके मॅक्स पेंटचे वरिष्ठ अधिकारी सचिन भावसार, प्रवीण राऊत, मानस जैन, विजय जगताप, रवींद्र नरवाडे, योगेश कळसकर आदी मान्यवर उपस्थित होते. अनावरण होताच उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात या नवीन उत्पादनाचे स्वागत केले. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी यावेळी 'मॅजेस्टा टू शाइन'च्या वैशिष्ट्यांची सविस्तर माहिती दिली.

# शहरातील वाहतूक सुरळीत होईल का

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**अकोला :** शहरातील विविध भागात दररोज कोणत्या तरी रस्त्यावर जॅम लागतो. त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. ही समस्या दूर होईल का अशी विचारणा स्थानिक रहिवासी करीत आहेत. रविवारी दुपारी मदनलाल धिंग्रा चौकात वाहतूक विस्कळीत झाली होती. वाहतूक शाखा पोलिसांना तेथे पोहचून रस्ता मोकळा करून द्यावा लागला. ही समस्या एका दिवसापुरती नाही तर रोजच हा त्रास सोसावा लागत आहे. ऑटोरिक्षा तसेच अन्य वाहने कुठेही उभी राहत असल्यामुळे वाहतूकीला अडथळा निर्माण होतो.

# लाडक्या बहिणींना दोन महिन्यांपासून मदत नाही

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

## ♦ लाभार्थी महिलांमध्ये नाराजीचा सूर

**अकोला :** लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना दोन महिन्यापासून मदतीची रक्कम न मिळाल्याने लाडकी बहीण योजनेमधील लाभार्थी महिलांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे. लाभार्थी महिलांनी संबंधित कार्यालयात प्रश्न विचारला असता उवाउडवीची उत्तरे देण्यात येत आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही २८ जून २०२४ रोजी महाराष्ट्र सरकारने मंजूर केली आणि जुलै २०२४ मध्ये अंमलबजावणी सुरु झाली. यानंतर पात्र महिलांना मासिक १,५०० थेट त्यांच्या बँक खात्यात दिले जाऊ लागले. अकोला जिल्ह्यात जिल्ह्यात सुमारे ४ लाख ३७ हजार महिलांनी पहिल्यांदा लाभार्थी म्हणून नोंदणी केली होती. मात्र, ई-केवायसी आणि इतर पडताळणी नंतर काही महिलांना लाभ बंद करण्याची प्रकिया राबविण्यात आली. यातच आता लाडकी बहीण योजने मधील अकोला जिल्ह्यातील अनेक लाभार्थी महिलांना मागील दोन महिन्यांपासून अनुदानाची रक्कम मिळालेली नसल्याची तक्रार पुढे आली आहे. नियमितपणे खात्यावर जमा होणारी ही रक्कम ही अचानक थांबल्याने महिलांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

महिलांच्या सांगण्यानुसार, घरगुती खर्चासाठी या योजनेतील मदत महत्त्वाची ठरते. मात्र, सलग दोन महिन्यांपासून रक्कम न मिळाल्याने आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. काहींनी संबंधित कार्यालयात चौकशी केली असता तांत्रिक कारणांमुळे विलंब झाल्याचे सांगण्यात आले. प्रशासनाने लवकरात लवकर प्रलंबित रक्कम जमा करण्याची मागणी लाभार्थी महिलांकडून करण्यात येत आहे.

# पिडीतेवर अत्याचार प्रकरणी नराधामास 20 वर्षे सक्तमजुरीची शिक्षा

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**अकोला :** पीडितेवर अत्याचार प्रकरणी आरोपीला २० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा न्यायालयाने सुनावली. २१ रोजी अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांनी निकाल दिला.

बार्शिटाकळी तालुक्यातील वाघजळी येथील पोक्सो कायद्या मधील आरोपी अन्वेश सिध्दार्थ पवार २५ वर्ष याच्या विरूध्द १२.०२.२०२३ रोजी फिर्यादी पिडीतेने पो.स्टे.ला रिपोर्ट दिला की ११.०२.२०२३ रोजी दुपारी १२.३० वाजताचे सुमारास फिर्यादी घरी काम करीत होती. तिची मुलगी पिडीता बाहेर खेळत होती. काम संपल्यावर फिर्यादीने मुलीला आवाज दिला परंतु ती दिसली नाही. तिला शोधत असता सिध्दार्थ पवारच्या घराजवळ सेंट्रो कार उभी होती. तेव्हा अमोल पवार याने फिर्यादीला सांगीतले की पिडीता कारमध्ये खेळत होती. फिर्यादी निळया रंगाचे कार जवळ गेली कारचा दरवाजा उघडत नव्हता. आतमध्ये पाहिले असता पिडीता व तिच्या सोबत आरोपी अन्वेष पवार हा होता. फिर्यादिला संशय आल्याने तिने गाडीचे काचावर थापा मारल्यानंतर आरोपीने कारचा दरवाजा उघडला. आरोपीला उडवाउडवीची उत्तरे दिली. पिडीतेला फिर्यादीने घरी नेऊन विचारपूस केली तेव्हा तिने दादाने मला सोडले नाही असे सांगितले. पिडीता घाबरलेली होती. पिडीतेवर अत्याचार झाल्याचे समजल्याने फिर्यादिने तिच्या पतीला घरी बोलावुन घेतले व हकिकत सांगितली. फिर्यादी, तिचे पती व पिडीता हिस सोबत घेवून बार्शिटाकळी पोलिस ठाण्यात तकार केली. पोलिस स्टेशनला कलम ३७६,३७६ अ, ब, ३७७ भादवी सह कलम ४,५, एम, ६, ८ पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हयाचा तपास सहायक पोलिस निरीक्षक स्मिता पाटील यांनी करून तपासाअंती न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते. न्यायालयात साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. आरोपी अन्वेष पवार विरुध्द गुन्हा सिध्द झाल्याने कलम ३,४ पोक्सो कायदयानुसार १० वर्ष सक्तमजुरी शिक्षा व १०००० रू दंड, दंड न भरल्यास ०१ महिना साधी कैद, कलम ५, एम, पोक्सो कायदयामध्ये २० वर्ष सक्त मजुरी शिक्षा व २०००० रू. दंड, दंड न भरल्यास ०२ वर्ष साधी कैद कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच पिडीतेला नुकसान भरपाई ३०,००० रू. देण्याचे आदेशात नमुद केले आहे. सरकार पक्षाची बाजू सरकारी अभियोक्ता के. जी. महाजन यांनी मांडली. कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून एएसआय पाचपोर, हेकॉ. किसनराव पातोंड, एएसआय पिंजरकर यांनी कोर्ट पैरवी म्हणून कामकाज पाहिले.

# शहर सौंदर्यीकरण स्थळांची दुरावस्था देखभाली अभावी भकास चित्र

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**अकोला :** शहरात सौंदर्यवर्धनासाठी उभारण्यात आलेल्या शिल्पे आणि कारंज्यांची सध्या दुरावस्था झाल्याचे चित्र दिसून येत आहे. लाखो रुपये खर्चून उभारलेल्या या रचनांकडे नियमित देखभाल न झाल्याने अनेक ठिकाणी भग्नावस्था निर्माण झाली आहे.

अकोला महानगरपालिका तसेच विविध सामाजिक आणि धार्मिक संस्थांच्या वतीने मुख्य चौकांमध्ये उभारण्यात आलेली शिल्पे आणि कारंजे आज दुर्लक्षित अवस्थेत आहेत. शहरातील लक्झरी बस स्थानक परिसरात उभारण्यात आलेले बर्ड पक्ष्यांचे आकर्षक शिल्प सध्या खराब अवस्थेत दिसत आहे. हिरव्यागार रंगाचा चटईवर साकारलेले दोन बर्ड पैकी एक बर्ड तुटलेल्या अवस्थेत खाली पडलेला आहेत. इतके नव्हें तर याला लगेच असलेल्या अन्य सौंदर्यकरणाच्या शिल्प



धूळ, कचरा आणि तांत्रिक कारणामुळे अस्वच्छ दिसत आहे. कधीकाळी शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या या रचना आता भकास दिसू लागल्या आहेत. काही ठिकाणी दिव्यांची व्यवस्था बंद असून, संपूर्ण परिसर दैनिय अवस्थेत आहे.'शहराच्या सौंदर्यासाठी लाखो रुपये खर्च केले जातात, पण देखभाल नसल्याने सर्व काही वाया जात आहे. प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे.' या परिस्थितीबाबत नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत असून, संबंधित प्रशासनाने तातडीने दुरुस्ती आणि नियमित देखभालीची प्रभावी व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे. शहर सौंदर्यकरणासाठी केलेले प्रयत्न आणि खर्च व्यर्थ जाऊ नयेत, यासाठी ठोस उपाययोजना आवश्यक असल्याचे नागरिकांचे मत आहे. शहराच्या प्रतिमेशी निगडित असलेल्या या रचनांकडे प्रशासनाच्या वतीने किती लवकर लक्ष दिले जाते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# उन्हाळा लागला अन् लिंबाच्या भावातही तेजी

प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**अकोला :** उन्हाळ्यात रसवंती, शीतपेय गृह तसेच घरगुती वापरासाठी लिंबाची मागणी वाढते. मागणी आणि पुरवठा यात तफावत झाली की भाव वाढतात. नेमका हाच प्रकार लिबांच्या बाबतीत झालेला दिसतो. सध्या १५० ते २०० रुपये किलो भाव आहे. किरकोळ विक्री ५ रुपयाला एक लिंबू या प्रमाणे होत आहे. उन्हाळ्यात बाहेर पडताना लिंबू सरबत, ताक घेतले जाते. तसेच गृहिणी लिंबू, आंबा यांचे लोणचे घालतात. तसेच रसवंती चालक ऊसाच्या रसाला अधिक स्वाद आणण्यासाठी लिंबूचा रस पाळतात. लिंबू दाह शांत करते त्यामुळे लिंबाचा वापर या काळात अधिक प्रमाणात होतो. त्यामुळे




दरात वाढ झालेली दिसते.

बाळापूर तालुक्यातील वाडेगाव भागातून अकोला शहरच नव्हे तर महाराष्ट्राच्या बाहेर देखील लिंब जात होते. परंतु आता ती स्थिती राहिली नाही. विविध कारणांमुळे लिंबांची झाडे कमी झाली. आता बाहेरून येणाऱ्या लिंबावर अवलंबून रहावे लागत आहे. त्यामुळे देखील चढ्या भावात लिंबू खरेदी करण्याशिवाय पर्याय नाही. आगामी काळात आवक व्यवस्थित राहिली तरच भाव नियंत्रित राहू शकतात असे विक्रेत्यांचे म्हणणे आहे.

# हिवरखेड मोराडी शेत रस्ता व्यवस्थित करून द्या

## ♦ शेतकऱ्यांचे तहसीलदारांना निवेदन




प्रतिनिधी २२ फेब्रुवारी

**हिवरखेड:** मोराडी शेत शिवाराकडे जाणारा रस्ता काही शेतकऱ्यांनी संगमताने खोदून अडविला आहे. त्यामुळे शेताकडे जाणाऱ्या वहिवाट करणाऱ्या संबंधित शेतकऱ्यांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. शेतात जाण्यायेण्यासाठी कोणताही पर्यायी मार्ग उपलब्ध नसल्याने शेतीची मशागत ,पेरणी ,तसेच शेतातील इतर साहित्य ने आण करणे कठीण होत आहे.

गेल्या अनेक वर्षापासून वहिवाटीचा हाच शेत शिव रस्ता आहे, आहे या प्रकरणी संबंधित शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयात जाऊन महसूल विभागाला लेखी स्वरूपाचे निवेदन दिले. रस्ता तात्काळ मोकळा करून देण्यात यावा अशी मागणी शेतकरी राजेश गावंडे, गोपाल गावंडे, जी एस, गावंडे, बी एस गावंडे, यांनी केली. याकडे दुर्लक्ष केल्यास आम्हाला संबंधित तहसील कार्यालयासमोर उपोषणाला बसावे लागेल असा इशारा दिला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK